पाक्षिक

# मनोगत

प्रदेश बीजेपी

मुंबई • वर्ष: 7 • अंक: 4 • 16 फेब्रुवारी, 2025 • पृष्ठसंख्या: 36 • किंमत: 5 रू.



# दिल्लीही जिंकली

पाक्षिक मनोगत प्रदेश बीजेपी



अध्यक्षीय मनोगत

# मोदीजींच्या नेतृत्वाचा विजय

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारतीय जनता पार्टीने दिल्ली विधानसभा निवडणुकीत ऐतिहासिक विजय मिळविला. भाजपाने ७० पैकी ४८ जागा जिंकून दोन तृतियांश जागांसह खणखणीत बहुमत मिळविले. मोदीजींच्या नेतृत्वाचा हा विजय आहे. त्यांच्या नेतृत्वातच दिल्लीचा विकास देशाच्या राजधानीला साजेसा होईल याची जनतेला खात्री वाटली. गेली दहा वर्षे मोदीजींच्या नेतृत्वात झालेला देशाचा विकास जनतेने पाहिला आहे. गरीब कल्याण, आर्थिक विकास, भव्य पायाभूत सुविधा प्रकल्प आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताची वाढलेली प्रतिष्ठा ही मोदीजींच्या राजवटीची वैशिष्ट्ये आहेत. त्यांच्या कारकिर्दीत अयोध्या येथे राम मंदिर उभारण्यात आले. तसेच त्यांच्या सरकारने काश्मीरला स्वतंत्र संविधानाचा अधिकार देणारे घटनेचे कलम ३७० रद्द केले. दिल्लीच्या जनतेने २०१४, २०१९ व २०२४ या तीनही लोकसभा निवडणुकीत लोकसभेच्या सर्व सात जागा भाजपाला दिल्या. विधानसभा निवडणुकीत मात्र दिल्लीच्या जनतेने आम आदमी पार्टीला कौल दिला होता. तथापि, जनतेला अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वातील आम आदमी पक्षाचा खोटारडेपणा आणि भ्रष्टाचार ध्यानात आला. आम आदमी सरकारच्या बेफिकीरीमुळे राजधानी दिल्लीतील रस्ते, पाणी पुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन यांची अवस्था वाईट झाली. त्याचा दुष्परिणाम जनतेला भोगावा लागला. दुसरीकडे केजरीवाल यांनी जनतेच्या पैशाने बांधलेला शीशमहल लोकांनी पाहिला. अशा स्थितीत सर्वसामान्य माणसाच्या कल्याणासह दिल्लीला सर्व सुविधांनी युक्त आधुनिक शहर बनविण्यासाठी जनतेने मोदीजींवर भरवसा ठेवला आणि भाजपाला सेवेची संधी दिली. आता दिल्लीला भाजपाचे डबल इंजिन सरकार मिळाले आहे. दिल्लीच्या भाजपा कार्यकर्त्यांचे मी अभिनंदन करतो. दिल्लीतील भाजपाच्या यशात तेथील कार्यकर्त्यांनी बूथ पातळीवर केलेल्या कार्याचा मोठा वाटा आहे. बूथ स्तरावर झटून काम करणारे कार्यकर्ते हे भाजपाचे महत्त्वाचे भांडवल आहे. सध्या राज्यात संघटनपर्व चालू आहे व पक्षाने प्राथमिक सदस्यांच्या संख्येच्या बाबतीत एक कोटीचा महत्त्वाचा टप्पा ओलांडला आहे. महाराष्ट्रात भाजपाची सदस्य संख्या दीड कोटी होण्यासाठी आपण सर्व कार्यकर्ते प्रयत्न करत आहोत. समाजाच्या प्रत्येक घटकामध्ये, प्रत्येक जातीमध्ये, प्रत्येक पंथामध्ये भाजपाचे सदस्य असले पाहिजेत. भाजपा सर्वस्पर्शी असला पाहिजे असा आपला प्रयत्न आहे. या प्रयत्नाला यशही आले आहे. मराठा, ओबीसी, दलित, आदिवासी अशा सर्व घटकातील लोकांना जोडल्यामुळे भाजपाची सदस्य संख्या एक कोटीच्या पुढे गेली आहे. आपल्याला सर्वांना सोबत घेऊन पुढे जायचे आहे. प्रत्येक बूथमध्ये सक्रीय सदस्यांची फळी निर्माण करायची आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देशाचा होत असलेला विकास आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महाराष्ट्र घेत असलेली भरारी यामुळे अनेकजण भाजपाचे सदस्य होण्यास इच्छुक आहेत. आपल्याला समाजातील प्रत्येक घटकाशी संपर्क साधत, 'हार्ट टू हार्ट संवाद' करून लोकांना जोडायचे आहे. केवळ चाळीस दिवसात राज्यातील कार्यकर्त्यांनी एक कोटी सदस्य संख्येचा टप्पा गाठला. आता लवकरच दीड कोटींचा टप्पा पूर्ण करू या.

**चंद्रशेखर बावनकुळे**

# अंतरंग




संपादक : गणेश हाके
सल्लागार : माधव भांडारी
आ. अतुल भातखळकर

@manogatbjp

सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया,
bjpmaha.manogat@gmail.com
editor.bjpmanogat@gmail.com
येथे पाठवाव्यात.

संपादकीय सल्लागार

चंद्रहास मिरासदार
सजावट व मांडणी : गौतम आर्य
सहाय्यक : प्रेरणा तळेकर-वीर

विभागीय समन्वयक

मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) : श्रीनिवास कुलकर्णी
विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड, प्रवीण गमे
पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर
उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे

दिल्लीही जिंकली ........ ०४



दीड कोटी सदस्य नोंदणीचा टप्पा पार करु ........ ०८




5 लाख सक्रीय सदस्य नोंदवायचे आहेत ........ १०



कुशासन आणि भ्रष्टाचाराचा पराभव ........ ११



केजरीवालांच्या ढोंगाचा पराभव ........ १३



अटलजींनी जेंव्हा सायकलवरुन प्रवास केला... ........ १८



हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद कुलकर्णी यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४००० २० येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, नरिमन पॉईंट, मुंबई -२० येथे प्रकाशित केले. संपादक : गणेश हाके, संपर्क : ०२२-२२०२२०५०

# दिल्लीही जिंकली



● नरेंद्र मोदी, पंतप्रधान

दिल्ली विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर केंद्रीय कार्यालयात झालेल्या विजयोत्सवावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कार्यकर्त्यांना संबोधित केले. या संवादाचा संपादित अंश...

**दिल्लीतील** नागरिकांमध्ये आज आपल्या विजयाचा उत्साह आहे. त्याचबरोबर एका मोठ्या त्रासातून, संकटातून सुटल्याची भावनाही दिल्लीच्या जनतेमध्ये आहे. आपण 'आपदा मुक्त झालो', या भावनेने सामान्य दिल्लीकरांमध्ये समाधानाची भावना आहे. दिल्लीच्या विकासातील मोठा अडथळा या निकालामुळे दूर झाला आहे. निवडणुकीपूर्वी दिल्लीतील प्रत्येक नागरिकाला मी पत्र पाठविले होते. दिल्लीला विकसित भारताची राजधानी बनविण्यासाठी भारतीय जनता पार्टीला संधी देण्याची विनंती मी या पत्रात केली होती. दिल्लीच्या नागरिकांनी 'मोदींच्या गॅरंटीवर'

विश्वास ठेवल्याबद्दल मी दिल्लीकरांना नम्रतापूर्वक नमन करतो. दिल्लीकरांनी दिलेले प्रेम, आमच्यावर दाखवलेला विश्वास हे आमच्यावरचे मोठे कर्ज आहे, अशी आमची भावना आहे. आता डबल इंजिन सरकार दुप्पट वेगाने दिल्लीचा विकास करून या कर्जाची व्याजासह परतफेड करेल.

भारतीय जनता पार्टीचा हा विजय ऐतिहासिक आहे. भारतीय जनता पार्टीला विजयी करून मतदारांनी दिल्लीवरील 'आपदा' दूर केली आहे. म्हणूनच या विजयाला मोठे महत्व आहे. दिल्लीकर एका दशकानंतर या 'आपदे'मधून आज मुक्त झाले आहेत. दिल्लीकरांनी दिलेला जनादेश अत्यंत स्पष्ट आहे. विकास, व्हिजन आणि विश्वास याचा दिल्लीत विजय झाला आहे. अराजकता, अहंकार, आडंबर (नाटकीपणा) याचा दिल्लीत पराभव झाला आहे. दिल्ली आपल्या मालकीची अशा घमेंडीत वावरणाऱ्यांना मतदारांनी धडा शिकवला आहे. राजकारणात यश मिळवण्यासाठी खोटेपणा आणि फसवाफसवीचा शॉर्टकट वापरणाऱ्यांना दिल्लीच्या जनतेने घरी बसवले आहे. असे शॉर्टकट वापरणाऱ्यांचे शॉर्टसर्किट करून मतदारांनी आपण किती जागरूक आहोत, हे दाखवून दिले. देशभरातील भाजपा कार्यकर्त्यांना आणि दिल्लीतील कार्यकर्त्यांनाही केंद्रात सत्ता असूनही दिल्लीत यश मिळत नसल्याबद्दलची खंत व्यक्त होत होती. आज ही खंत दूर झाली आहे. आम्हाला दिल्लीच्या सेवेची संधी द्यावी, ही आमची विनंती दिल्लीकरांनी मान्य केली आहे. दिल्लीतील युवा पिढी आणि एकविसाव्या शतकात जन्मलेले विद्यार्थी, तरुण यांना प्रथमच भारतीय जतना पार्टीच्या सुशासनाचा अनुभव घेता येणार आहे. भाजपाच्या डबल इंजिन सरकारवर देशातील जनतेचा विश्वास किती वाढतो आहे, हे या निकालाने सिद्ध झाले आहे.

दिल्लीच्या निकालाला दुसरी बाजू ही आहे. दिल्ली हे केवळ महानगर नसून संपूर्ण देशाचे प्रतिबिंब या शहरात दिसून येते. म्हणून दिल्लीला 'मिनी हिंदुस्थान' म्हणतात. अशा या दिल्लीमध्ये 'एक भारत, श्रेष्ठ भारत' या विचाराचा विजय झाला आहे. दक्षिण, पश्चिम आणि पूर्व भारतातील नागरीकही दिल्लीमध्ये मोठ्या संख्येने वास्तव्यास आहेत. विविधतेने भरलेल्या दिल्लीने भारतीय जनता पार्टीला मोठ्या जनादेशाचा आशीर्वाद दिला आहे. दिल्लीच्या सर्व भागांमध्ये भारतीय जनता पार्टीचे उमेदवार विजयी झाले आहेत. प्रचारामध्ये भाग घेताना मी पूर्वांचलमधून लोकसभेवर निवडून आल्याचा आवर्जुन उल्लेख करत असे. दिल्लीमधील पूर्वांचलच्या नागरिकांनी माझ्या आवाहनाला भरभरून प्रतिसाद दिल्याबद्दल मी पूर्वांचलच्या नागरिकांचे आभार मानतो. दिल्लीमधील विजयाबरोबर अयोध्येतील मिल्कीपुर विधानभा मतदारसंघातही आपण शानदार विजय मिळवला आहे. या विजयाबद्दल मी उत्तर प्रदेशच्या कार्यकर्त्यांचे आभार मानतो. देशातील मतदार तृष्टीकरणाला नव्हे तर भारतीय जनता पार्टीच्या संतुष्टीकरणाच्या धोरणावर विश्वास ठेवत आहेत. दिल्लीचे गेल्या १० वर्षात विकासाच्या विविध क्षेत्रात मोठे नुकसान झाले. केंद्र सरकारची सतत संघर्ष करण्याची वृत्ती असल्याने अनेक विकास योजनांना दिल्लीत गती मिळू शकली नाही. या 'आपदा'वाल्यांनी दिल्लीतील मेट्रोच्या कामाला विरोध दर्शविला, झोपडपट्टीवासियांना त्यांच्या हक्काची घरे देण्यातही या 'आपदा'ने विरोध केला. 'आपदा' सरकारमुळेच दिल्लीतील सामान्य माणसाला आयुष्मान भारत योजनेचा लाभ मिळू शकला नाही. विकासात सातत्याने अडथळे आणण्याच्या 'आप'च्या राजकारणाला मतदारांनी स्पष्टपणे नाकारले आहे. दिल्लीकरांनी गेल्या १० वर्षात जे काही अनुभवले त्यामुळेच दिल्लीकरांनी सुशासनासाठी या निवडणुकीत कौल दिला आहे. जनतेचा हा विश्वास सार्थ ठरवण्यासाठी मी आणि माझे सर्व सहकारी कसोशीने प्रयत्न करतील, अशी ग्वाही यानिमित्ताने मी देतो. देशात जिथे-जिथे राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे (एनडीए) सरकार असते तेथे जनतेला सुशासन, विकास आणि विश्वासाची हमी असते. ज्या-ज्या राज्यांमध्ये मतदारांनी राष्ट्रीय लोकशाही आघाडीला जनादेश दिला आहे, त्या राज्यांना आम्ही विकासाच्या नव्या ऊंचीवर नेऊन ठेवले आहे. त्यामुळेच मतदार भारतीय जनता पार्टीला सातत्याने विजयी करत आहेत. उत्तराखंड, हरयाणा, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, गोवा, महाराष्ट्र, आसाम, अरुणाचल प्रदेश, बिहार, मणिपूर या राज्यांमध्ये आम्ही सलग दुसऱ्यांदा, तिसऱ्यांदा सत्तेत आलो आहोत. उत्तर प्रदेशसारख्या राज्यात कायदा आणि सुव्यस्थेचा प्रश्न किती गंभीर बनला होता, याची दिल्लीकरांना चांगलीच कल्पना आहे. मात्र उत्तर प्रदेशमध्ये आम्ही निर्धार शक्ती दाखवत कायदा आणि सुव्यवस्था प्रस्थापित केली आणि तेथील महिलावर्गाला सुरक्षित केले.











हरयाणात प्रशासनातील भ्रष्टाचार कमी करत गोरगरिबांना न्याय दिला. हरयाणात काँग्रेसचे सरकार असताना सरकारी नोकरी लाच दिल्याशिवाय मिळतच नसे. भाजपा सरकार आल्यावर भ्रष्टाचार संपुष्टात आला. त्यामुळे गोरगरीब, वंचितवर्गातील युवकांना सरकारी नोकऱ्या एका पैशाची लाच न देता मिळू लागल्या. महाराष्ट्रात दुष्काळाचे संकट दूर करण्यासाठी भाजपा सरकारने जलयुक्त शिवार अभियान राबवले. त्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांना पाणी मिळू लागले आहे. भारतीय जनता पार्टी सुशासनाचे नवे प्रारूप (मॉडेल) तयार करत आहे. पूर्वी गुजरातमध्ये पाण्याअभावी शेतकऱ्यांना अनेक संकटांना सामोरे जावे लागत असे. आम्ही गुजरातमधील टंचाईग्रस्त भागापर्यंत पाणी पोहचवून शेतकऱ्यांच्या विकासाला हातभार लावला.

एनडीए म्हणजे सुशासनाची खात्री आहे. सुशासनामुळे मध्यमवर्गाबरोबरच गोरगरिबांनाही फायदा होतो. दिल्लीतील झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या लोकांनी आणि मध्यमवर्गीयांनी भारतीय जनता पार्टीला मोठा पाठिंबा दिला आहे. समाजाच्या सर्व वर्गातील नागरिक भारतीय जनता पार्टीच्या मागे उभे आहेत. भारतीय जनता पार्टीची केंद्रात सत्ता असतानाच दिल्लीत मेट्रो सुरू झाली. आमच्या सरकारने गेल्या १० वर्षात अनेक शहरांमध्ये मेट्रो सेवा सुरू केली आहे. पायाभूत सुविधांबरोबरच आयुष्मान भारतसारख्या योजनांमुळे गोरगरिबांच्या आणि मध्यमवर्गीयांच्या आरोग्यविषयक गरजा पूर्ण झाल्या आहेत. देशातील नारी शक्तीने आम्हाला नेहमीच आशीर्वाद दिला आहे. दिल्लीच्या निवडणुकीतही नारी शक्तीने आम्हाला मोठा आशीर्वाद दिला. देशातील अनेक राज्यांमध्ये महिलावर्गाला आमच्या सरकारच्या योजनांचे लाभ मिळत आहे. दिल्लीतील महिलावर्गाला दिलेली आश्वासने आम्ही पूर्ण करू. दिल्लीकर नागरीक रस्त्यांवरचे खड्डे, कचऱ्याचे ढीग, प्रदुषित हवेमुळे, अनियमित पाणीपुरवठ्यामुळे त्रस्त झाले होते. या सर्व समस्यांपासून भाजपा सरकार तुम्हाला मुक्ती मिळवून देईल. यमुनामैया ही सर्वांच्याच श्रद्धेचा विषय आहे. मात्र 'आपदा'सरकारच्या काळात आमच्या यमुनेची कशी दुर्दशा झाली, हे आपण पाहिले आहे. 'आपदा' सरकारने दिल्लीकरांच्या श्रद्धेचा अपमान केला. यमुना स्वच्छ करायचे आश्वासन 'आपदा'सरकारला पूर्ण करता आले नाही, म्हणून त्यांनी हरयाणा सरकारवर दोषारोप केले. यमुनेची स्वच्छता करण्याचे आश्वासन आम्ही प्रचारादरम्यान दिले आहे. हे आश्वासन आम्ही पूर्ण करणार आहोत. काँग्रेसचे नेते अर्बन नक्षलवाद्यांची भाषा बोलत आहेत. काँग्रेस नेत्यांची भाषा देशात अराजकता निर्माण करण्याची आहे. दिल्लीकरांनी या विजयाद्वारे आमच्यावर मोठी जबाबदारी सोपविली आहे. ही जबाबदारी पार पाडण्याचा आम्ही प्रयत्न करू. दिल्लीला विकसित भारताची विकसित राजधानी बनवू. **जय हिंद!**

# दीड कोटी सदस्य नोंदणीचा टप्पा पार करु




● **देवेंद्र फडणवीस**, मुख्यमंत्री

> मुंबईत नुकत्याच झालेल्या संघटन पर्व कार्यशाळेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या मार्गदर्शनाचा संपादित अंश.

**प्रामाणिकपणे** संघटन पर्व राबवणारा भाजप हा एकमेव पक्ष असून आपण लवकरच दीड कोटी सदस्य नोंदणीचा टप्पा पार करू, असा मला विश्वास आहे. देशात भारतीय जनता पार्टी हा एकमेव पक्ष आहे जो प्रामाणिकपणे आपले संघटन पर्व राबवतो. देशात प्रत्येक पक्षाला आपले संविधान तयार करावे लागते आणि त्या संविधानाच्या अनुरुप लोकशाही पद्धतीने पक्षाची रचना उभी करावी लागते. हे कायद्याने खरे असले तरी अशा प्रकारे लोकतांत्रिक पद्धतीने पक्षांतर्गत लोकशाहीची व्यवस्था उभी करणारा आपला पक्ष एकमेव आहे. या संघटन व्यवस्थेचा भाग म्हणून आपण प्राथमिक सदस्यांची नोंदणी करण्यापासून सुरुवात करतो.

देशामध्ये प्राथमिक सदस्य नोंदणी ची मोहिम सुरु झाली तेव्हा हरियाणा, महाराष्ट्र, झारखंड या राज्यांत निवडणुका होत्या. म्हणून केंद्रीय भाजपाने या राज्यांना सुट दिली होती की, त्यांनी त्यांच्या निवडणुकीनंतर प्राथमिक सदस्यता नोंदणी सुरू करावी. त्यामुळे आपल्याला अधिक वेळ मिळाला आहे.

प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दीड कोटी प्राथमिक सदस्य नोंदविण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. २०१४ साली अमित शाह अध्यक्ष झाल्यानंतर भाजपाला जगातील सर्वात मोठा पक्ष बनवण्याचा निर्णय घेऊन पक्षाचे संघटन पर्व म्हणजेच सदस्य नोंदणी अभियान सुरु केले. चीनच्या कम्युनिस्ट पक्षाला मागे टाकत आपण देशात ११ कोटी सदस्य करून जगातला सर्वात मोठा पक्ष बनलो. यावेळी आपण स्वत:चाच विक्रम मोडत देशात १३ कोटींपेक्षा जास्त सदस्य केले आहेत. राज्यात आजपर्यंत आपण ९८ लाख सदस्य केले आहेत. पुढच्या दोन ते तीन दिवसांत आपण १ कोटींचा आकडा पूर्ण करू. तसेच यात मागे राहिलेल्या काही जिल्हे आणि मतदारसंघांनी लक्ष घातले तर आपण दीड कोटींचा आकडा पार करून पावणे दोन कोटींपर्यंत जाऊ शकतो, एवढी क्षमता आपली आहे.



आपल्या ज्या आमदारांनी, जिल्ह्यांनी उत्तम काम केले आहे, त्यांनी जे काम केलं ते करता येते हे आपल्या सगळ्यांना पटत आहे. आपल्या पक्षाने सुरु केलेल्या पद्धतीमुळे आपल्याकडे खोट्या मेंबरशिपला वाव उरला नाही. अनेक लोकांनी प्रत्येकी १ हजार सदस्य नोंदणीचा आकडा पूर्ण केला आहे. मात्र, काही मतदारसंघ अजूनही २० हजाराच्या खाली आहेत. यात थोडे लक्ष घातले पाठपुरावा केला तर कुठलाच मतदारसंघ ५० हजारांच्या खाली राहू शकत नाही, अशी भाजपची यंत्रणा आणि कार्यकर्ते आहेत. ही भाजपाची आज महाराष्ट्रात तााकद आहे. १४९ जागा लढवून १३७ आमदार निवडून येतात, आपला शक्तीशाली पक्ष असून आपली मोठी ताकद आहे. १० ते ११ दिवसांत रोज ५ लाख सदस्य करावे लागतील. असे केल्यास येत्या १५ तारखेपर्यंत दीड कोटींचा टप्पा निश्चित आपण पार पाडू. त्याचसोबत आपण सक्रिय सदस्यता नोंदणीही सुरू केली आहे.

आपल्या पक्षाच्या संविधानाने प्राथमिक सदस्य होण्याकरीता सगळ्यांना मुभा दिली आहे. पण पक्षामध्ये ज्याला पदाधिकारी, लोकप्रतिनिधी व्हायचे आहे, तो सक्रिय सदस्य असणे गरजेचे आहे. सक्रिय सदस्य होण्याकरिता त्या सक्रिय सदस्याने स्वत: च्या आयडीवरून १०० सदस्य केले पाहिजे. त्यामुळे हे १०० सदस्य करवून घेऊन त्याला सक्रिय सदस्य बनवणे हे अत्यंत महत्वाचे आहे.

सक्रीय सदस्य म्हणजे त्याने भाजपाचे कार्य करायचं मान्य केलं आहे, पक्षाचे दैनंदिन काम करतो अशा प्रकारचा सक्रीय कार्यकर्ता असेल सक्रीय सदस्यता पाहिजे असेल तर त्या य सदस्याने १०० सदस्य नोंदणी केले पाहिजेत.

काही युवा मोर्चाचे तरुण, मुले चांगले सक्रीय सदस्य होतील, माझ्या सारखी लोकं सक्रीय सदस्य होऊ शकत नाहीत. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या विशेष अधिकारातून मी सक्रीय सदसत्व स्वीकारलं असलं, तरीही मी माझे १०० सदस्य पूर्ण करणार आहे. आपणही प्रयत्नपूर्वक ज्यांना सक्रीय सदस्य करत आहात त्यांच्याकडूनच १०० सदस्य जर करून घेतले तर खऱ्या अर्थाने भाजपाच्या संविधानाला जे अपेक्षित आहे तसे सक्रीय सदस्य निर्माण होतील. भाजपा कागदावरचा पक्ष राहणार नाही सामान्य जनतेचा पक्ष होईल. संघटन जेवढं मजबूत आहे, जेवढं सक्रीय आहे तेवढी सत्ता समाजापर्यंत पोहोचते. समाजापर्यंत पोहोचायचे काम संघटन करत असतं ज्या जिल्हात आपल्याला पालकमंत्री देता आले नाही तिथे आपण काही संपर्कमंत्री दिले आहेत. त्यांच्या माध्यमातून जनतेला आपले म्हणणे मांडणे किंवा जनतेच्या समस्या सोडवण्याचे काम होईल. आपल्या सरकारने महाराष्ट्रात अतिशय गतीशिलतेने काम सुरु केले असून आपल्याला जनतेला परिणामकारक बदल दाखवायचा आहे. लोकांच्या जीवनात परिवर्तन करण्यासाठी संघटनेचा जास्तीत जास्त सहभाग आवश्यक आहे. त्यादृष्टीने सर्वांनी काम करावे. ■

# 5 लाख सक्रीय सदस्य नोंदवायचे आहेत

● चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश अध्यक्ष व महसूल मंत्री

**संघटनपर्वात** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्यात एक कोटी सदस्यांचा टप्पा ओलांडण्याचा निर्धार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी केला होता. एक जानेवारीपासून पक्षाच्या सदस्यता मोहिमेस सुरुवात झाली होती व चाळीस दिवसांच्या कालावधीत पक्षाच्या कार्यकर्त्यांनी एक कोटी सदस्यसंख्येचा टप्पा ओलांडला. मा. देवेंद्रजींच्या नेतृत्वात पक्षाचे सर्व मंत्री, खासदार, आमदार, राष्ट्रीय पदाधिकारी, प्रदेश पदाधिकारी, जिल्हाध्यक्ष यांच्यासह सर्व कार्यकर्त्यांनी सदस्यता अभियानात योगदान दिले. भाजपा राष्ट्रीय अध्यक्ष मा. जगत प्रकाश नड्डाजी आणि राष्ट्रीय सहसंघटनमंत्री शिवप्रकाशजी यांचे मोलाचे मार्गदर्शन या मोहिमेत लाभले.



संघटन पर्वाअंतर्गत महाराष्ट्र भाजपाने १ कोटी सदस्य नोंदणीचा ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. येत्या १५ दिवसांत आणखी ५० लाख सदस्य नोंदवून दीड कोटी सदस्य नोंदणीचे लक्ष्य साध्य केले जाईल. संघटन पर्वाअंतर्गत महाराष्ट्र भाजपाने १ कोटी सदस्य नोंदणीचा ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. येत्या १५ दिवसांत आणखी ५० लाख सदस्य नोंदवून दीड कोटी सदस्य नोंदणीचे लक्ष्य साध्य केले जाईल. भाजपा सदस्य नोंदणी अभियानामध्ये पंचायत ते पार्लमेंट स्तरावरचे सर्व लोकप्रतिनिधी, बूथ अध्यक्ष ते प्रदेशाध्यक्ष तसेच पक्ष संघटनेच्या सर्व घटकांनी सहभाग घेतला. आता पुढील १५ दिवस ७८ संघटनात्मक जिल्ह्यांमधील ७९२ मंडलांमध्ये प्रभावीपणे संघटन पर्व राबवण्यात येणार आहे.प्रत्येक कार्यकर्त्याने अधिकाधिक प्राथमिक सदस्य करावेत अशी सूचना होती. त्यानुसार कमी अधिक संख्येने कार्यकर्त्यांनी प्राथमिक सदस्य जोडले आहेत. प्राथमिक सदस्य करण्याची संपूर्ण प्रक्रिया संगणकीकृत आहे. यामध्ये सदस्य झालेल्या प्रत्येक व्यक्तीची माहिती संकलित करण्यात आली आहे. सदस्यता अभियानात युवक आणि महिलांना पक्षाचे प्राथमिक सदस्य करण्यावर विशेष भर देण्यात आला. भारतीय जनता युवा मोर्चाचे १०० पूर्ण वेळ कार्यकर्ते या मोहिमेत १८ ते २५ वयोगटातील युवक युवतींना भाजपा सदस्य करण्यासाठी अल्पकालीन विस्तारक म्हणून काम करत होते. तसेच महिला मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी प्रत्येक विधानसभा मतदारसंघात महिलांसाठी सदस्यता अभियान राबविले. याच पद्धतीने ओबीसी, दलित आणि आदिवासी समाजातील कार्यकर्ते पक्षाचे प्राथमिक सदस्य म्हणून जोडून घेण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले. भाजपा समाजाच्या सर्व घटकांना स्पर्श करणारा सर्वस्पर्शी आणि राज्याच्या सर्व भौगोलिक विभागांमध्ये प्रभावी अस्तित्व असेलला सर्वव्यापी पक्ष झाला आहे. प्रत्येक वाडी, वस्ती, पाडे, गावांपर्यंत पोहोचून सदस्य नोंदणीला वेग दिला जाईल. लवकरच दीड कोटी प्राथमिक सदस्य, ५ लाख सक्रीय सदस्य,१ लाख १८६ बूथ अध्यक्ष,१ हजार मंडल यामुळे पक्ष संघटना अधिक मजबूत होणार आहे. प्राथमिक सदस्य नोंदणीबरोबरच ५ लाख सक्रीय सदस्य नोंदविण्याचे लक्ष्य पक्षाने ठेवले आहे. एका बूथवर ५ सक्रीय सदस्य केले जातील. सक्रीय सदस्य झाल्याशिवाय कोणत्याही शासकीय महामंडळावर, जिल्हा, तालुका स्तरीय शासकीय समितीवर नियुक्ती होणार नाही.

### *१८५६ कार्यकर्त्यांनी एक हजार सदस्य केले*


*किमान एक हजार प्राथमिक सदस्य करणारे पक्षाचे १८५६ कार्यकर्ते आहेत. त्यांचे मी विशेष अभिनंदन करतो. प्रत्येकी पाचशे ते एक हजार प्राथमिक सदस्य जोडणारे १७२६ कार्यकर्ते आहेत.*

बूथ अध्यक्ष ते प्रदेशाध्यक्ष अशा सर्वांना सक्रीय सदस्य व्हावे लागणार आहे. डबल इंजिन सरकारमुळेच विकसित महाराष्ट्र होईल हा विश्वास राज्यातील जनतेच्या मनात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शब्दावर, विचारांवर जनतेला विश्वास असल्याने इतक्या मोठ्या संख्येने नागरिक भाजपाचे सदस्य होण्यास उत्सुक आहेत. ■

# कुशासन आणि भ्रष्टाचाराचा पराभव

> बारा वर्षांपूर्वी सर्वसामान्य नागरिकांच्या मनात स्वच्छ, कार्यक्षम, लोककल्याणकारी राज्यकारभाराचे स्वप्न जागवत सत्तेवर आलेल्या आम आदमी पक्षाचा राष्ट्रीय राजकारणात मोठा बोलबाला झाला होता.





**एकेकाळी** भारतीय जनता पार्टीला राष्ट्रीय पर्याय उभा करण्याची आव्हानात्मक भाषा करणारा हा पक्ष आणि या पक्षाचे नेतृत्व करणारे अरविंद केजरीवाल यांना दिल्लीतल्या मतदारांनी अपेक्षेप्रमाणे जोरदार धक्का दिला आहे. त्याचबरोबर दिल्लीतल्या मतदारांनी विधानसभेत आप आणि लोकसभेला भाजपा असा निर्णय याआधीच घेतला असल्याने यावेळीही आम आदमी पक्षाचा विजय निश्चित आहे, असे गणित मांडणाऱ्या राजकीय विश्लेषक आणि अभ्यासकांचे अंदाजही दिल्लीतल्या मतदारांनी साफ खोटे ठरवले आहेत. दिल्लीतला निकाल हा 'ब्रँड केजरीवाल' चा पराभव आहेच पण त्याच बरोबर धार्मिक अनुनयाचे घातक राजकारण करणाऱ्या आप च्या रणनीतीचाही पराभव आहे. २०११ मध्ये दिल्लीत ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी भ्रष्टाचार हटाव चा नारा देत केलेल्या लोकआंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सामान्य नागरिकांच्या मनात आशा अपेक्षांचे अंकुर पेरणाऱ्या केजरीवालांनी पाहता पाहता अण्णांची भ्रष्टाचार विरोधी चळवळ खिशात घातली. राजकारण्यांबद्दल तिटकारा असलेल्या मोठ्या वर्गाचे प्रतिनिधित्व करीत केजरीवाल यांनी सुशासन, लोककल्याण, भ्रष्टाचार विरहीत राजकारणाचे नवे समीकरण अशा खुबीने मांडले की दिल्लीकरांनी केजरीवालांवर २०१५ आणि २०२० अशा सलग दोन निवडणुकांत मतांचा अक्षरशः वर्षाव केला. लक्षात घ्या, या दोन्ही विधानसभा निवडणुकांपूर्वी ६ महिने आधी झालेल्या लोकसभा निवडणुकीत दिल्लीकरांनी भारतीय जनता पार्टीचे सर्वच्या सर्व म्हणजे ७ उमेदवार भरघोस मतांनी विजयी केले होते. भाजपाला २०१५ आणि २०२० च्या विधानसभा निवडणुकीत अनुक्रमे ३ आणि ८ जागा मिळाल्या होत्या. ७० पैकी ६७ म्हणजे टक्केवारीच्या भाषेत बोलायचं झालं तर सुमारे ९६ टक्के यश. एवढे महाप्रचंड यश आजवर कोणत्याही पक्षाला मिळविता आले नव्हते. या यशामागे अरविंद केजरीवालांची प्रस्थापित राजकारण्यांपेक्षा असलेली वेगळी प्रतिमा हेच प्रमुख कारण होते. त्याच्या जोडीला मोफत वीज, पाणी, शिक्षण या सारख्या आश्वासनांची जोड होती. या ब्रँड केजरीवालचे तेज गेल्या वर्ष दोन वर्षांत हळूहळू फिके पडू लागले होते. २०१३ मध्ये सरकारी बंगला, सरकारी वाहने वापरणार नाही, असं जाहीर करणारे केजरीवाल आपल्या सरकारी निवासस्थानावर ५० कोटींपेक्षा अधिक खर्च करताना दिल्लीकरांनी पाहिले, तेंव्हापासूनच या ब्रँड



## अहंकाराचा पराभव

**मला वाटतं की जर एखादी व्यक्ती खूप अहंकारी झाली आणि लोकांसाठी काम करणं थांबवलं तर लोक त्या माणसाला धडा शिकवतात. आज अरविंद केजरीवाल यांच्या बाबतीतही तेच घडलं आहे. आपण सर्वांनी पक्षाला खूप योगदान दिलं आहे. आपण दिल्ली बदलण्याची दृष्टी घेऊन आलो होतो... पण दुर्दैवाने, आपल्या नेतृत्वामुळे आपण ते करू शकलो नाही, ज्यांना अंतर्गत लोकशाहीवर विश्वास नाही, ज्यांना खोटं बोलून, लोकांना मारहाण करून काहीही करून सुटका मिळते असे वाटते, हे खरोखर दुर्दैवी आहे... दिल्लीचे स्वप्न हरले आहे. आपला मोठा पराभव झाला आहे पण मी यासाठी अरविंद केजरीवाल यांना जबाबदार धरते.**

**जर तुम्ही दिल्लीत सध्या कोणताही परिसर किंवा वसाहत पाहिली तर... ती दुरावलेली आहे. तिथे प्रशासन नाही. रस्ते तुटलेले आहेत, ड्रेनेज व्यवस्था ओसंडून वाहत आहे, रस्त्यांवर घाण आणि कचरा आहे, पाणीपुरवठा प्रदूषित आहे - तिथे काळे पाणी आहे किंवा पिवळे घृणास्पद पाणी आहे किंवा अजिबात पाणी नाही. यमुना अत्यंत प्रदूषित आहे आणि तिथे वायू प्रदूषण आहे. हे सर्व चालू असताना, अरविंद केजरीवाल काय करतात? ते 'शीशमहाल' निर्माण करतात,**

**- खा. स्वाती मालिवाल**

केजरीवालचे खरे रूप उघड होऊ लागले होते. दिल्ली सरकारच्या मद्य विक्री घोटाळ्याने अरविंद केजरीवाल आणि मनीष सिसोदिया या मंडळींच्या स्वच्छ प्रतिमेचे उरलेसुरले सोवळेही फिटले.

मद्य विक्री परवाने देताना केजरीवाल सरकारने केलेले घोटाळे पुराव्यांसह जगजाहीर झाल्यानंतर आणि या घोटाळ्याबद्दल तुरुंगात जावे लागले तरीहि केजरीवाल कंपूचा अहंकाराचा तोरा कमी होण्याची चिन्हे नव्हती. स्वाती मालीवाल या सहकारीला केजरीवालांच्या उपस्थितीत मुख्यमंत्री निवासस्थानात झालेल्या मारहाणीनंतर केजरीवाल यांचा खुनशी, क्रूर चेहराही दिल्लीकरांनी अनुभवला. सरकारी तिजोरीतला एक पैसाही स्वतःच्या सोयी-सुविधांसाठी खर्च करणार नाही असे जाहीर करणाऱ्या केजरीवाल यांच्याकडून घोर अपेक्षाभंग झाल्यामुळे 'आप तो ऐसे ना थे' असं म्हणतच दिल्लीतला मतदार यावेळी मतदानासाठी बाहेर पडला होता. त्याचबरोबर गेल्या दहा वर्षांत प्रचंड बहुमताची सत्ता असूनही रस्ते, अनियमित पाणीपुरवठा, कचराकोंडी यासारखे मूलभूत प्रश्नही सोडवू न शकल्याने केजरीवाल यांच्या कार्यक्षम कारभाराचे पितळही उघडे पडले होते. दिल्ली महापालिकांची सत्ता हातात असूनही आप सरकारला यांना रस्त्यातले खड्डेही बुजविता आले नव्हते. दिल्लीकरांना बंद पाईपलाईनद्वारे पाणीपुरवठा करू हे आश्वासनही आप सरकारला पूर्ण करता आले नव्हते. या स्थितीत दिल्लीत धार्मिक अनुनयाचे राजकारण करण्याचा घातक मार्ग केजरीवालांनी पत्करला. त्याचीही फळे त्यांना भोगावी लागली आहेत. २०२० च्या सुरुवातीला दिल्लीत नागरिकत्व सुधारणा कायद्याला (सीएए) विरोध करण्यासाठी झालेले शाहीनबाग आंदोलन, त्यानंतर झालेली दंगल यात केजरीवाल यांच्या पक्षाने बजावलेली भूमिका आपची सुरु झालेली घसरण दर्शविणारीच होती. केजरीवाल यांनी काँग्रेसच्याही दोन पावले पुढे टाकत तुष्टीकरणाच्या राजकारणाचे टोक गाठले होते. या राजकारणाची किंमत कधी ना कधी केजरीवालांना चुकवावीच लागणार होती. विधानसभा निवडणुकीतच त्यांना तुष्टीकरणाची किंमत पराभवाच्या रूपाने मोजावी लागली. विकास कामे न करता आल्याचे खापर कायम केंद्र सरकारवर फोडणाऱ्या केजरीवाल यांच्या राजकारणाला वैतागलेल्या मतदारांनी सत्ता बदल करण्याचा पर्याय निवडला. सामान्य दिल्लीकर माणसाला विकासासाठी डबल इंजिन सरकारची आवश्यकता पटली. केजरीवाल आणि त्यांचा कंपू मतदारांच्या संदेशातून योग्य तो धडा घेईल, अशी अपेक्षा करण्यास हरकत नाही. ■

# केजरीवालांच्या ढोंगाचा पराभव



राजकारणातील 'घाण' साफ करण्यासाठी आम्ही राजकारणात उतरलो आहोत, असे जाहीर करणाऱ्या अरविंद केजरीवाल यांच्यावर विविध क्षेत्रातील कर्तृत्वान लोकांनी विश्वास ठेवला होता. मात्र हा विश्वास केजरीवाल यांनी खोटा ठरविला.

● प्रसाद देशपांडे

> दिल्ली आणि एक्सटेंडेड दिल्ली (एनसीआर, विधानसभेच्या दृष्टीने हरियाणा) भागात एकत्रितरित्या भाजपाची सत्ता भाजपच्या जन्मापासून कधीच आली नाही! २०२५ साली ती पहिल्यांदा आली! आणि दिल्लीत तर तब्बल २७ वर्षांनी! त्यामुळे हा विजय हा नक्कीच मोठा विजय आहे!

**त्यातही** तो केजरीवालांविरुद्ध आहे त्यामुळे त्याचं कवित्व ही तितकंच मोठं आहे. केजरीवाल हे अण्णा आंदोलनातून पुढे आलेलं नेतृत्व! राजकारणाचं आदर्शीकरण करण्यावर त्यांचा भर! केजरीवालांची डाळ इथे सर्वप्रथम शिजली आणि नंतर पंजाबमध्ये! अण्णा आंदोलनाचा हेतू चांगला होता पण त्या आजूबाजूची जी लबाड चांडाळ चौकडी होती त्याने त्या आंदोलनाचे पूर्ण लोणी लाटले आणि आंदोलनातील प्रामाणिक लोकांच्या हातात मिळालं बाबाजीचा ठुल्लू! केजरीवालांची वृत्तीच मुळात लबाड, लबाडी ही त्यांच्या ठायी ठायी असल्यामुळे त्याच लबाड वृत्तीतून त्यांनी राजकारण केलं. त्यांचे अनेक उत्तम सहकारी ज्यांना खरंच बदल घडवण्याची इच्छा होती आकांक्षा होती एकूण केजरीवालांना जे अडचणीचे ठरले असते त्या सगळ्या नेत्यांना केजरीवालांनी पद्धतशीरपणे बाजूला सारून आपलं एकखांबी नेतृत्व आम आदमी पक्षात निर्माण केलं! आप म्हणजे केजरीवाल आणि केजरीवाल म्हणजे आप हे समीकरण झालं! कुमार विश्वास, योगेंद्र यादव, प्रशांत भूषण, किरण बेदी, शाजिया इल्मी, अलका लांबा, कपिल मिश्रा, कैलाश गहलोत, आशुतोष अशी अनेक नावं घेता येतील जी केजरीवालांच्या 'आप' शी जोडली गेलेली पण नंतर बाजूला झाली किंवा केली गेली! कारण एकच अरविंद केजरीवालांशी त्यांचं पटलं नाही!

मफलर मॅन, आम आदमी, दिल्ली का लड़का अशी असंख्य रूपं केजरीवालांनी घेतली! मोठ्या कार्यक्रमात चप्पल, सँडल घालून येणं, 'मै हू आम आदमी' छाप गांधी

टोपी घालणं, अत्यंत गया गुजऱ्या अवतारात मुख्यमंत्रीपदाच्या पहिल्या कार्यकाळात वावरणं हे सगळे धंदे केजरीवालांनी केले! दिल्लीकरांना ही स्टंटगिरी भावली. दिल्लीच्या लोकांना मी दोष देणार नाही! अण्णा, केजरी, आम आदमी ह्यांची क्रेज २०११ ते २०१४ मी नागपुरला बघितली आहे. नावं घेणार नाही पण माझ्या अनेक मित्रांवर केजरीवालांचं गारुड होतं. दिल्लीतल्या लोकांवर ते दहा वर्ष टिकलं इतकंच. सत्य आणि ढोंग ह्यातलं अंतर ओळखण्यात कधीकधी जन्म निघून जातो त्यामानाने दिल्लीच्या लोकांचं एक तप च गेलं म्हणायचं.

भारतीय मतदार हा बऱ्यापैकी क्षमाशील प्रवृत्तीचा असतो तुम्ही त्याला फारसा त्रास दिला नाहीत किंवा त्याच्या रोजच्या जगण्याच्या आयुष्यात विघ्न आणली नाही तर तो तुम्हाला सत्तेपासून दूरही करत नाही, उलट सतत तुम्हाला सत्तेवर बसवतो. हा पण पण त्याच भारतीय मतदाराला उद्या तुम्ही मूर्ख समजू लागला, त्याला गृहीत धरू लागला, त्याला दूषणं द्यायला लागलात, तर मात्र मग भारतीय मतदार तुम्हाला तुमची लायकी चटकन दाखवतो आणि इतक्या वाईट पद्धतीने दाखवतो की तुमच्या डोळ्यासमोर दिवसाढवळ्या तारे चमकल्याशिवाय राहत नाहीत! दिल्लीच्या मतदारांना केजरीवाल वेड्यात काढायला लागला होता! ह्या जन्मीचं सोडा मला हरवायला मोदींना पुढचा जन्म घ्यावा लागेल! ह्या जन्मात तुम्ही मला दिल्लीत हरवू शकत नाही! २०२५ काय २०५० मध्येही मीच मुख्यमंत्री असेन! ही भाषा अत्यंत उद्धट, उर्मट होती! वरून मला भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली जेलमध्ये टाकलं तरीही मी तिथून राजच्या कारभार हाकणार! मी राजीनामा देत नसतो! काय उखाडायचं आहे उखाडा! नंतर राजीनामा देऊन केलेला संत्री रोना, आतिशीला मुख्यमंत्री करून निवडणुकीच्या प्रचारसभेत मात्र बहुमत आल्यास मीच मुख्यमंत्री बनणार (गंमत अशी त्याच आतिशीला लोकांनी जिंकवलंय आणि केजरीवाल सिसोदियांना पाडलंय, भारतीय मतदार मतदान करतांना किती स्पष्ट भूमिका ठेवतो हे त्याचं ज्वलंत उदाहरण आहे! केजरीवाल वजा आप हे त्यांना चालणार होतं की. हे माजोरडे स्वर आळवणे, हे टिपिकल केजरीवाल राजकारण होते. मोदी बदमाश, न्यायव्यवस्था अन्याय करणारी, निवडणूक आयोग विकलेला, विरोधी पक्ष चोर, प्रचारसभेत माझ्या विरुद्ध घोषणा देणारे अमित शाहचे एजंट, उपदेश/टीका करणारे



मला सोडून गेलेले माझे जुने सहकारी पैशांचे भुकेले, मीच काय तो फक्त एकटा स्वच्छ, सुशील, चारित्र्य संपन्न, असं कंठशोष करत सांगणाऱ्या केजरीवालांचे खरे रूप मतदारांनी ओळखले होते. 'भ्रष्टाचारमुक्त दिल्ली' ह्या सारख्या उदात्त घोषणेने सुरु झालेला प्रवास त्याच इतर राजकीयपक्षांसारखा प्रतिक्रियावादी राजकारणापर्यंत, थेट शिशमहल ते पाणी, बिजली, दारू घोटाळ्यापर्यंत येऊन ठेपला हे केजरीवालांच्या राजकारणाचं गणित आहे. स्वतःच स्वतःची राजकीय कबर खोदून त्यात स्वतःच स्वतःच्या गळ्यात हार घालून वाजंत्री वाजवत केजरीवालांनी उडी मारली. अर्थात ती कबर खोदतांना त्यांच्याच सहकाऱ्यांनी दिलेले सल्ले आज त्यांना आठवणार असतील तर किमान ईडी त्यांची राजकीय कबरीत जेंव्हा उकरेल तेंव्हा त्यांना जड जाणार नाही.

माझ्या दिल्लीच्या एका जुन्या मित्राला फोन केला, पूर्वाश्रमीचा आपिया आणि गेल्या १-२ वर्षांपूर्वीच लख्ख डोळे उघडलेल्या त्याला विचारलं और भाई क्या चल राह है, त्यावर तो म्हणाला अरे भाई पनौती चली गई! त्याच्याशी गप्पा मारल्या आणि नंतर मोदींचं भाषण ऐकलं त्यात मोदींनी मांडलेला मुद्दा मला फार आवडला. चांगल्या युवकांनी जास्तीत जास्त संख्येने राजकारणात यावे कारण सांगताना मोदी म्हणाले 'आज देश को धूर्तता और मूर्खता की राजनीती से दूर रखना है'! माझा मित्र आणि मोदी जवळपास सारखंच बोलत होते. आप नावाच्या लांडग्यांच्या टोळीला आणि त्यांच्या 'धूर्त' मुखियाला 'मूर्ख' समजल्या जाणाऱ्या 'दिल्लीच्या पब्लिकने'च आवाक्यात आणला आहे. ■

# भारताच्या संरक्षण क्रांतीची झेप



सात शेजारी राष्ट्रांना लागून असलेली १५ हजार किलोमीटर पेक्षा जास्त लांबीची सीमा आणि साडेसात हजार किलोमीटर पेक्षा जास्त लांबीच्या सागरी सीमांच्या संरक्षणासाठी 'राष्ट्र सर्वोपरी' हे धोरण आज संरक्षण क्षेत्रात भारताला आत्मनिर्भर बनवत आहे. निर्यातीमध्ये नवे विक्रम आणि स्वदेशीकरणाच्या धोरणासह मोदी सरकारने गेल्या दहा वर्षात सीमावर्ती भागात उत्कृष्ट पायाभूत सोयीसुविधा उभारल्या. आता नवी लढाऊ विमाने आणि नवोन्मेश- तंत्रज्ञान- संशोधन यातून लष्कराच्या ताफ्याच्या सामर्थ्यात भर पडली आहे. शौर्य आणि कर्तव्य यांची गाथा असलेले भारताचे लष्कर प्रत्येक भारतीयाला प्रेरित करते...

**उरी** इथल्या हल्यानंतर लक्ष्यभेदी हल्ला असो किंवा पुलवामा नंतर बालाकोट हवाई हल्ला किंवा लडाखमध्ये गलवान खोऱ्यात प्रत्यक्ष नियंत्रण रेषा (एलएसी) उल्लंघनाचा प्रयत्न किंवा नियंत्रण रेषेवर घूसखोरीचा प्रयत्न किंवा इतर सीमांवर अतिक्रमणाचे प्रयत्न. भारतीय लष्कर अशा कुरापतीना चोख प्रत्युत्तर तर देत आहेच त्याचबरोबर अतुलनीय शौर्याचे दर्शन घडवत आपल्या इंचभर जमिनीकडेही कोणी वाकड्या नजरेने पाहायला धजावू शकत नाही असा खंबीर संदेश भारताने जगाला दिला आहे. ४ डिसेंबरला आपण नौदल दिवस आणि ७ डिसेंबरला सशस्र सेना ध्वज दिन साजरा करत आहोत अशा वेळेला तिन्ही सैन्यदलांच्या सशक्तीकरणाचा उपक्रम, संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भरता आणि भारतीय सैन्य आणि आपला प्रदेश भक्कम पायाभूत सुविधांनी युक्त करणे, सबल राष्ट्र–समर्थ सैन्य याची प्रचीती देत आहे.

अधिक सामर्थ्यवान होणारे भारतीय सैन्य हे या नव भारताचे चित्र आहे ज्याने १९६२ च्या मानसिकतेमधून कोसो योजने दूर जात जगाला दाखवून दिले आहे की शांततेसाठीच्या आपल्या कटिबद्धतेला दुबळेपणा समजू नये. विस्तारवादाच्या युगाची समाप्ती होण्याच्या आणि विकासवादाच्या आवश्यकतेवर भर देत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सैन्याशी संवाद साधताना म्हटले होते, आपण अशा भूमीचे वीर आहात ज्या भूमीने हजारो वर्षे अनेक आक्रमणकर्त्यांचे हल्ले आणि अत्याचारांना चोख प्रत्युत्तर दिले आहे, आपण असे लोक आहोत जे बासरीधारी कृष्णाची पूजा करतो आणि सुदर्शन चक्रधारी कृष्णालाही आपला आदर्श मानतो.

शांततेसाठीच्या कटीबद्धतेला हानी पोहोचवणाऱ्या देशांच्या प्रयत्नांना चोख प्रत्युत्तर देण्यासाठी भारत आज समर्थ आहे त्याचे सर्वात मोठे कारण आहे ते म्हणजे मागच्या काही वर्षात आपल्या सीमा सुरक्षित करण्यासाठी देशाने या भागात पायाभूत सुविधांच्या विकासाला प्राधान्य दिले आहे.भारतीय लष्कराच्या, लढाऊ विमाने, आधुनिक हेलीकॉप्टर, क्षेपणास्त्र संरक्षण प्रणाली यासारख्या इतर आवश्यकतांवरही भर देण्यात आला आहे. नवे तंत्रज्ञान आणि संशोधन यामुळे सीमावर्ती भागातल्या पायाभूत

सुविधा इतक्या भक्कम आणि सक्षम झाल्या आहेत की शत्रूच्या प्रत्येक कारवायांची माहिती लष्कराला वेळेवर मिळते आणि त्याचा समर्थ मुकाबला करण्यात येत आहे. नव भारताच्या या बदलत्या चित्राचे सर्वात मोठे उदाहरण म्हणजे उरी हल्याला प्रत्युत्तर म्हणून लक्ष्यभेदी हल्ला आणि पुलवामा हल्यानंतर केलेला बालाकोट हवाई हल्ला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या १० वर्षांच्या शासन काळात देशात बॉम्बस्फोटासारखी मोठी घटना झालेली नाही.

**आता आम्ही आत्मनिर्भर बनू इच्छितो आणि मी आपल्या संरक्षण दलांना मनापासून धन्यवाद देऊ इच्छितो, हजारो अशा वस्तूंची सूची त्यांनी तयार केली आहे, ज्या परदेशातून आणणार नाही असा निश्चय त्यांनी केला आहे. राष्ट्रासाठी जीवन म्हणजे काय हे आपल्या सेन्याच्या जवानांनी दाखवले आहे. यामुळे संरक्षण क्षेत्रामध्ये आपण आत्मनिर्भर होऊ लागलो आहोत. – नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

## संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भरता

● २०२३–२४ या वित्तीय वर्षात संरक्षण उत्पादन १.२७ लाख कोटी रुपयांच्या विक्रमी स्तरावर पोहोचले. याच वित्तीय वर्षात संरक्षण निर्यात २१ हजार ८३ कोटी रुपयांच्या विक्रमी स्तरावर पोहोचली. वित्त वर्ष २०२२–२३ च्या तुलनेत ही ३२.५ टक्के जास्त आहे. याशिवाय २०२४–२५ या वित्तीय वर्षाच्या पहिल्या तिमाहीत संरक्षण निर्यातीने मोठी झेप घेतली आहे. पहिल्या तिमाहीत ६ हजार ९१५ कोटी रुपयांची संरक्षण उपकरणे निर्यात करण्यात आली असून २०२३–२४ या वित्त वर्षाच्या पहिल्या तिमाहीच्या ३ हजार ८८५ कोटी रुपयांच्या तुलनेत ती ७८ टक्के जास्त आहे. भारत आता १०० पेक्षा जास्त देशांना संरक्षण उत्पादने निर्यात करत आहे.

● दोन दशके म्हणजे २००४–०५ पासून २०१३–१४ आणि २०१४–१५ ते २०२३–२४ या काळातल्या तुलनात्मक आकडेवारीवरून संरक्षण निर्यातीत २१ पट वाढ झाल्याचे दिसून येत आहे. २००४–०५ ते २०१३–१४ पर्यंतच्या काळात एकूण संरक्षण निर्यात ४ हजार ३१२ कोटी रुपये होती, जी २०१४–१५ ते २०२३–२४ या काळात वाढून ८८ हजार ३१९ कोटी रुपये झाली आहे. (१ एप्रिल २०२४ पर्यंतच्या आकडेवारीनुसार) ३३४% संरक्षण निर्यातीमध्ये गेल्या पाच वर्षांमध्ये वाढ झाली आहे.

● भारताची संरक्षण उत्पादन परिसंस्था नवी शिखरे साध्य करत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि स्पेनचे पंतप्रधान पेड्रो सांचेझ यांनी २८ ऑक्टोबर २०२४ ला गुजरातमधल्या वडोद्रा येथे टाटा ॲडव्हान्स सिस्टम लिमिटेड (टीएएसएल) परिसरात सी–२९५ विमान उत्पादनासाठी टाटा एअरक्राफ्ट संकुलाचे संयुक्तपणे उद्घाटन केले. ऑक्टोबर २०२२ मध्ये कारखान्याची पायाभरणी झाली होती. हे सयंत्र आता सी–२९५ विमानांच्या उत्पादनासाठी सज्ज आहे. सी–२९५ कार्यक्रमांतर्गत एकूण ५६ विमाने वितरीत करण्यात येणार असून यापैकी १६ स्पेनमधून एअरबसद्वारे थेट वितरीत करण्यात येतील तर उर्वरित ४० ची भारतात निर्मिती करण्यात येईल. यामुळे 'मेक इन इंडिया बरोबरच मेक फॉर दी वर्ल्ड' अभियानालाही वेग प्राप्त होईल.

● जून २०२४ पर्यंत, संरक्षण क्षेत्रातल्या सार्वजनिक उपक्रमांकडून (डीपीएसयु) आणि सेवा मुख्यालय द्वारा स्वदेशी उत्पादनासाठी उद्योगांना ३६ हजाराहून जास्त संरक्षण वस्तूंची ऑर्डर देण्यात आली होती. यापैकी १२ हजार ३०० पेक्षा जास्त वस्तूंचे गेल्या तीन वर्षात स्वदेशीकरण करण्यात आले आहे. परिणामी डीपीएसयुने देशातल्या विक्रेत्यांना ७ हजार ५७२ कोटी रुपयांची ऑर्डर दिली आहे.

● भारत आज डॉनियर–२२८, १५५ एमएम ॲडव्हान्स टोड आर्टिलरी गन, ब्राम्होस क्षेपणास्त्र, आकाश क्षेपणास्त्र प्रणाली, रडार सिम्युलेटर, सुरुंगापासून संरक्षण देणारी वाहने, लोखंडी जाळ्यांनी युक्त गाड्या, पिनाक रॉकेट आणि लॉन्वर, दारुगोळा, थर्मल इमेजर, बॉडीआर्मर बरोबरच रिप्लेसेबल युनिट्स, विमानशास्त्र आणि छोट्या शस्त्रांचे भाग निर्यात करतो.

● केंद्र सरकारकडून धोरणात्मक बदल करण्यात आल्याने सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग आणि स्टार्ट अप्ससह अनेक उद्योग संरक्षण डिझाईन, विकास आणि उत्पादनासाठी पुढे येत आहेत. गेल्या सात–आठ वर्षात सरकारने उद्योगांसाठी जारी केलेल्या संरक्षण परवान्यांच्या संख्येत सुमारे २००% वाढ झाली आहे.

● मेक इन इंडिया मोहिमेअंतर्गत सशस्त्र दलांसाठी देशात प्रथमच उत्तम प्रतीची शस्त्रास्त्रे आणि जवानांच्या

पायाभूत गरजांची पूर्तता करण्यासाठी बुलेटप्रुफ जॅकेट यासारखी सामग्री तयार करण्याचा प्रारंभ झाला आहे.

● सेवांच्या एकूण ५०९ वस्तूंच्या पाच 'संपूर्ण स्वदेशी सूची' आणि संरक्षण सार्वजनिक क्षेत्र उपक्रमांच्या (डीपीएसयु)च्या ५ हजार १२ वस्तूंच्या पाच सूचींसाठी अधिसूचना जारी करण्यात आली आहे ज्यामध्ये निर्धारित काळानंतर आयातीवर प्रतिबंधाचा समावेश आहे.

● संरक्षण उत्पादनात आत्मनिर्भर भारत यासाठी प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने स्वदेशी विक्रेत्यांकडून खरेदीसाठी ५२ हजार कोटी रुपयांचे स्वतंत्र बजेट निर्धारित करण्यात आले आहे.

● संरक्षण उत्पादनांची देशातच निर्मिती व्हावी यासाठी प्रोत्साहन देण्याकरिता फेब्रुवारी २०१८ मध्ये संरक्षण कॉरिडॉर्ची घोषणा करण्यात आली. यापैकी एक उत्तर प्रदेशात तर दुसरा कॉरिडॉर तामिळनाडूमध्ये आहे. २०२५ पर्यंत ३५ हजार कोटी रुपयांच्या संरक्षण उत्पादन निर्यातीचे लक्ष्य साध्य करण्याचे भारताचे उद्दिष्ट आहे. या दिशेने हे महत्वाचे पाऊल आहे.

● मोदी सरकारने औद्योगिक परवान्यासाठी संरक्षण उत्पादनांची सूची अधिसूचित केली. डीआरडीओ आणि संरक्षण उत्पादन विभागामार्फत खाजगी उद्योग आणि स्टार्ट अप समवेत सहभागाला प्रोत्साहन दिले. 'भविष्यातील इन्फंट्री कॉंबेट व्हेईकल' प्रकल्पासाठी ईओएल जारी करण्यात आला.

● संरक्षण क्षेत्राशी जोडण्यासाठी छोट्या आणि लघु उद्योगांसमवेत स्टार्टअप्ससाठी प्रथमच उपक्रम घेण्यात आला आहे. iDEX नावाच्या या उपक्रमा अंतर्गत ५० पेक्षा जास्त स्टार्ट अप्सनी लष्कराच्या उपयोगासाठी तंत्रज्ञान आणि उत्पादने विकसित केली आहेत.

● ५०० कोटी रुपये संरक्षण स्टार्टअप्ससाठी वित्त वर्ष २०२१-२२ ते २०२५-२६ साठी स्वीकृत करण्यात आले आहेत.

● केंद्र सरकारने उचललेल्या पावलांमुळे भारत प्रथमच संरक्षण उत्पादनांच्या निर्यात क्षेत्रात जगातल्या सर्वोच्च २५ देशांच्या पंक्तीत सामील झाला आहे.

● वित्त वर्ष २०२२-२३ मध्ये संरक्षण उत्पादनाने प्रथमच एक लाख कोटी रुपयांचा टप्पा पार केला. वित्त वर्ष २०२१-२२ मध्ये हा आकडा ९५ हजार कोटी रुपये होता.

● वित्त वर्ष २०२३-२४ मध्ये संरक्षण विषयक खरेदी बजेटपैकी विक्रमी ७५ टक्के (सुमारे एक लाख कोटी रुपये) देशांतर्गत उद्योगांसाठी निर्धारित करण्यात आले आहे २०२२-२३ मध्ये ते ६८ टक्के होते.

● पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कर्नाटक मधल्या तुमकुर इथे भारताचा सर्वात मोठा हेलीकॉप्टर कारखाना हिंदुस्तान एअरोनॉटीक्स लिमिटेड (एचएएल) देशाला समर्पित केला. या कारखान्यात दरवर्षी सुमारे ३० हेलीकॉप्टरची निर्मिती केली जाईल आणि टप्याटप्याने यात दरवर्षी ६० ते ९० पर्यंत वाढ करता येईल.

● **२०२३ मध्ये कॅप्टन शिवा चौहान, सर्व अडथळे पार करत सियाचेन ग्लेशियरच्या कुमार पोस्ट इथे ऑपरेशनल तैनाती प्राप्त करणारी पहिली महिला अधिकारी ठरली. सियाचेन जगातली सर्वात उंच युद्धभूमी आहे.**


● कॅप्टन गीतिका कौल सियाचेन बॅटल स्कूलमध्ये यशस्वी प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर सियाचेनमध्ये नियुक्त होणारी पहिला महिला आरोग्य अधिकारी बनली.

● कॅप्टन फातिमा वासिम सियाचेन ग्लेशियरवर ऑपरेशनल पोस्टवर तैनात होणारी पहिली महिला आरोग्य अधिकारी बनली.

अशामध्ये हे जाणून घेणे आवश्यक आहे की नियंत्रण रेषा, प्रत्यक्ष नियंत्रण रेषा आणि इतर सीमांवर भारताचे भू सेना, नौसेना आणि हवाई दलाचे शुरवीर शत्रूच्या प्रत्येक कुरापतीला ताबडतोब प्रत्युत्तर देण्यासाठी सज्ज आहेत. याचे मोठे कारण सीमावर्ती भागातला अभूतपूर्व विकास आहे ज्यासाठी २०१४ मध्ये नरेंद्र मोदी पंतप्रधानपदी विराजमान झाल्यानंतर पर्यावरण विषयक मंजुरीची बाब असो किंवा निधी सर्व अडचणी दूर करुन सैन्यदलांना सामर्थ्यवान आणि अधिक सक्षम करण्यात आले. वन रॅन्क वन पेन्शन आणि सैनिक कल्याणा अंतर्गत असे अनेक महत्वाचे निर्णय घेण्यात आले जे आत्मबल वाढवण्यासाठी अतिशय महत्वाचे ठरले. संरक्षण दलांच्या सामग्रीविषयक आवश्यकता पूर्ण करण्यासाठी 'मेक इन इंडिया' अभियानांतर्गत देशामधेच संरक्षण उत्पादनाची निर्मिती व्हावी यासाठी प्रोत्साहन देण्यात येत आहे.

**(पूर्वार्ध)**

# अटलजींनी जेंव्हा सायकलवरुन प्रवास केला...



> दिवंगत पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांचे जन्मशताब्दी वर्ष सुरू झाले आहे. जनसंघाच्या स्थापनेपासून संघटनेत कार्यरत असणाऱ्या अटलजींनी जनसंघ आणि भाजपाचा चढ-उताराचा प्रवास अनुभवला. पक्षाच्या खडतर काळात अटलजी कधी नाउमेद झाले नाहीत. अशा अटलजींच्या महाराष्ट्रा संदर्भातील आठवणींना उजाळा देण्याचा प्रयत्न...

**भिवंडीत** ७ मे १९७० रोजी शिवजयंती निमित्ताने शहरात प्रचंड मोठी रॅली काढण्यात आली होती. मात्र ही रॅली भिवंडीतील सौदागर मोहल्ला या ठिकाणी पोहोचली असता या रॅलीवर दगडफेक आणि पेट्रोल बॉम्बचा मारा सुरू झाला. त्यामुळे भिवंडीत दंगलीचे वातावरण निर्माण झाले आणि अनेक ठिकाणी जाळपोळ देखील झाली. यामध्ये मोठी वित्तहानी आणि जीवितहानी झाली. या दंगलीमध्ये बाधित नागरिक आश्रयासाठी भिवंडी शहरातील दांडेकर हॉल याठिकाणी जमा झाले. मात्र त्यांची विचारपूस आणि चौकशी करण्यासाठी भिवंडी शहरात अटल बिहारी वाजपेयी १९७० मध्ये भिवंडीत आले होते. त्यावेळी ते खासदार होते. त्यांनी पीडित नागरिकांची अतिशय आपुलकीच्या भावनेने विचारपूस केली आणि भिवंडी शहरातील काही प्रतिष्ठित नागरिकांना जोडीला घेऊन त्यांच्याकडून देखील या दंगलीचे प्रकार विचारून घेतले. या दौऱ्यानंतर लोकसभेत अटलबिहारी वाजपेयींनी भिवंडीचा प्रश्न उपस्थित करत 'अब हिंदू मार नहीं खायेगा' असे ठणकावून सांगितलं. त्यानंतर त्यांचा भिवंडीचा असलेला दौरा तसेच त्यांनी केलेल्या भाषणाच्या आधारे अब हिंदू मार नही खायेगा असं पुस्तकही प्रकाशित झालं. स्वातंत्र्योत्तर भारताच्या इतिहासात संसदीय व्यासपीठावर इतक्य प्रखरपणे, ठामपणे हिंदुत्वाचा पुरस्कार करणारा पहिला नेता अशी अटलजींची प्रतिमा तेंव्हापासून तयार झाली.

अरे हॉटेलवाले शिंदे कहा है, शिंदे को बुलाव, अटल बिहारी वाजपेयी मनमाड शहरात दोन वेळा प्रचार सभेच्या निमित्ताने येऊन गेले. मनमाड शहरातील तत्कालीन जनसंघाच्या पदाधिकाऱ्यांशी त्यांचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध होते. शहरातील हॉटेल विसावाचे मालक आणि जनसंघाचे तत्कालीन जिल्हापदाधिकारी लक्ष्मणराव शिंदे यांच्याशी त्यांचे स्नेह जुळले होते. त्यांची ओळख हॉटेलवाले शिंदे या नावाने झाल्याने वाजपेयी जेव्हा पण नाशिकला येत, तेव्हा ते हॉटेलवाले शिंदे कहा है, बुलाव उनको असं म्हणत. अहमदाबाद येथील अधिवेशनात संतती नियमनाचा ठराव आल्यानंतर कोणीही त्याबद्दल बोलले नाही. मात्र मी उठून त्याला अनुमोदन दिले तेव्हा अटलजी म्हणाले कोई एक तो है जो इसके बाजूसे बोले...

### बेलापूर आणि अटलजी

सात किलोमीटरचा सायकल प्रवास, कार्यकर्त्यांसोबत फुटाणे-मुरमुऱ्यावर भूक भागवणारे अटलजी. बैलगाडीतून निघालेली मिरवणूक असे अटलजींचे अविस्मरणीय किस्से सांगताना बेलापूरकरांचे डोळेही पानावले. अटलबिहारी वाजपेयी यांचे अहिल्यानगर जिल्ह्यातील बेलापूर बुद्रूक गावावर विशेष प्रेम होते. वाजपेयींच्या निधनानंतर गाव शोकसागरात बुडालं. गाव कडकडीत बंद ठेवत ग्रामस्थांनी श्रद्धांजली वाहिली. बेलापूरला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे काम १९४० पासून जोमाने सुरु झालेले होते. ही बाब लक्षात घेऊन अटलजींनी २८ वर्षांचे असताना १९५२ मध्ये बेलापूरला जनसंघाचे प्रचारक म्हणून भेट देऊन त्यांच्याच उपस्थितीत जनसंघाची स्थापना केली. त्यावेळी ते रेल्वेने बेलापूर स्टेशनला आले. नंतर टांग्याने बेलापूर येथे आले. त्यांच्या उपस्थितीत बेलापूर परिसरात दिवसभर जनसंघाच्या प्रचार कार्यासंदर्भात भरगच्च कार्यक्रम झाले. त्यावेळी ते जनसंघाचे राष्ट्रीय सरचिटणीस होते. यावेळी कामाच्या व्यापात त्यांना जेवणाचेही भान राहिले नाही. रात्री १० वा. शेवटची रेल्वे होती आणि दुसऱ्या दिवशी नियोजित कार्यक्रम होते. त्यामुळे त्यांनी रात्रीचे जेवणही टाळले. त्यावेळी श्रीरामपूर-बेलापूर रस्ता म्हणजे निव्वळ निर्मनुष्य जंगल होते. त्यामुळे भीतीदायक हा रास्ता वाटायचा. बेलापूर-पढेगाव रस्त्यावर वस्त्या असल्याने भीती वाटत नसे. रात्रीचे नऊ वाजले आणि पढेगावहून रेल्वेने जायचे होते. त्यावेळी साधनांचा अभाव होता. अशावेळी गाडी चुकू नये म्हणून तत्कालीन जनसंघाचे कार्यकर्ते स्व. पांडुरंग शिंदे यांनी क्षणात सायकल आणली आणि अटलजींना चक्क सायकल पुढे नळीवर बसून सात किलोमीटर पढेगाव स्टेशनला सोडलं. रेल्वे स्थानकावर रेल्वे येण्यास तीन तास प्रतीक्षा होती. भूक लागली त्यामुळे स्टेशनवरच अटलजींनी फुटाणे मुरमुरे विकत घेतले आणि कार्यकर्त्यांसोबत त्यांनी ते खाल्ले. त्यानंतर फक्त तांब्याभर पाणी पिऊन अटलजी दहाच्या रेल्वेने रवाना झाले. या सर्व आठवणींना स्वर्गीय पांडुरंग शिंदे यांच्या परिवाराने उजाळा दिला. अटलजींनी बेलापूरला दोनदा भेट दिली. १९६७ साली नगरला सभेला जात असताना बेलापूरकरांनी त्यांचं जल्लोषात स्वागत करून त्यांची मिरवणूक देखील काढली. त्यावेळी त्या मिरवणुकीत मोहन जाधव हे सोबत होते. त्यानंतर अटलजी पंतप्रधान झाले तेव्हा त्यांना मोहन जाधव यांनी शुभेच्छा पत्र पाठवले. तेव्हा अटलजींनी दिल्लीस ये आणि आपला ५० वर्षांपूर्वीचा फोटो घेऊन ये म्हणजे मला ओळखू येईल, असं सांगितलं होतं. वय आणि कुटुंबाच्या अडचणी असल्याने मी जावू शकलो नाही त्यांच्या निधनाने दुःखी असल्याचं जाधव सांगतात. ■

### मनमोकळे अटलजी

**अटलजी आणि पुण्याचा संबंध खूप जवळचा होता. पुण्यात आल्यावर ते खूश असायचे. अटलजी एकदा पुण्यात आले असताना माझ्याकडे त्यांच्या व्यवस्थेची जबाबदारी होती. त्यावेळची माझी शरीरयष्टी बघून त्यांना मी पोलीस वाटलो. त्यामुळे त्यांनी 'आप चिंता मत करो, नीचे आरामसे बैठो' असे सांगितले. मी मात्र बाहेर उभा होतो. अखेर त्यांनी एका ज्येष्ठ नेत्याला बोलावून पोलिसांना खाली पाठवा, उभं राहण्याची आवश्यकता नाही असे सांगितले. संबंधित नेत्याने मी पोलीस नसून कार्यकर्ता आहे, असा खुलासा केल्यावर त्यांनी मला फार प्रेमाने आत बोलावले. त्यावेळी ते म्हणाले की, 'अरे भाई, मुझे बोलने का ना, चलो हम फोटो निकालते है'. त्याकाळात फोटो आजच्यासारखे वेड नसताना त्यांनी आस्थेने माझ्या खांद्यावर हात ठेवला आणि मला त्यांच्यासोबत फोटो काढण्याचा सुवर्णक्षण अनुभवला.**


**- योगेश गोगावले**

# भारताची संरक्षण उत्पादन क्षेत्रात गरुड झेप

● मनोहर विश्वासराव


भारत देश संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भर बनला असून भारत देश स्वतः संरक्षण उत्पादनांची निर्मिती करत आहे. यापूर्वी भारत देशाला संरक्षण उत्पादनांसाठी दुसऱ्या देशांवर अवलंबून राहावं लागायचं. पण पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या दूरदृष्टी निर्णयांमुळे आता भारत देशातच संरक्षण उत्पादनांची निर्मिती होत आहे. त्यामुळे भारताला पूर्वीसारखं संरक्षण उत्पादनांसाठी दुसऱ्या देशांवर अवलंबून राहण्याची गरज नाही.

**केंद्रात** पंतप्रधान नरेंद्र मोदींच सरकार आल्यानंतर पंतप्रधान मोदींनी स्वदेशी संरक्षण उत्पादनांच्या निर्मितीवर सर्वाधिक भर दिला. भारताच्या सुरक्षेसाठी संरक्षण उत्पादने बनवणाऱ्या संशोधन आणि विकास संस्था (डीआरडीओ) आणि हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड (हल) या संस्थांना मजबूत बनवलं. त्याचाच परिणाम म्हणजे संरक्षण उत्पादन क्षेत्रात आत्मनिर्भर बनलेला भारत. भारतात तयार झालेल्या संरक्षण उत्पादनांमुळे भारताच्या तिन्ही सैन्य दलांची ताकद अनेक पटींनी वाढली आहे. तसेच देशाचे संरक्षण क्षेत्र अधिक मजबूत बनलं आहे. भारताचं संरक्षण उत्पादन देशापुरतीच मर्यादित नसून भारत जगभरातील देशांना संरक्षण उत्पादने निर्यात करत आहे. भारताने संरक्षण उत्पादनांच्या निर्यातीत विक्रम रचला आहे. भारतात बनलेल्या स्वदेशी संरक्षण उत्पादनांना जगभरात प्रचंड मागणी आहे. आज भारत देश जगभरातील



शंभरहून अधिक देशांना संरक्षण उत्पादने निर्यात करत आहे. भारताची संरक्षण उत्पादन निर्यात दिवसेंदिवस वाढत आहे. भारताची संरक्षण उत्पादन निर्यात २०१६-१७ मध्ये १५२२ कोटी होती. ती निर्यात वाढून आता २०२३-२४ मध्ये २१ हजार ८३ कोटीपर्यंत गेली आहे. येत्या पाच वर्षांमध्ये भारतीय संरक्षण उत्पादनांच्या निर्यातीचा आकडा ५० हजार कोटी रुपयांपर्यंत नेण्याचं मोदी सरकारच लक्ष आहे.

भारताची स्वदेशी संरक्षण उत्पादने ही दर्जा आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या कसोटीवर सरस ठरली आहेत. भारताची संरक्षण उत्पादने ही जगभरातील देशांची प्रथम पसंती बनली आहे. भारतात बनलेल्या रणगाडे, हेलिकॉप्टर, लढाऊ विमान, पिनाका रॉकेट, सुपर सॉनीक मिसाईल, तोफ, रॉकेट लॉन्चर, रायफल, तोफ गोळे, बुलेटप्रूफ जॅकेट, सुरक्षा कवच आणि संरक्षण क्षेत्राशी संबंधित संरक्षण उपकरणे, यांसारख्या अनेक स्वदेशी संरक्षण उत्पादनांचा जगभरात डंका वाजत आहे. भारताच्या १०० कंपन्या स्वदेशी संरक्षण उत्पादन निर्मितीत महत्वपूर्ण योगदान देत आहेत. सर्वात महत्वाचं म्हणजे भारत देश जो दशकांपासून जगातील सर्वात मोठा संरक्षण उत्पादने आयात करणारा देश होता. आज तोच भारत देश हा जगभरातील अनेक देशांना मोठ्या प्रमाणावर संरक्षण उत्पादने निर्यात करणारा देश बनला आहे. गेल्या दहा








वर्षात भारताची संरक्षण उत्पादन निर्यात ही ३० टक्क्यांनी वाढली आहे. भारत देश हा सर्वाधिक संरक्षण उत्पादने निर्यात करणाऱ्या पहिल्या दहा मोठ्या देशांच्या यादीत गणला जात आहे. संरक्षण उत्पादनांच्या निर्मितीमुळे भारताची संरक्षण क्षेत्रातील ताकद वाढली आहे. त्यामुळे भारताच्या अर्थव्यवस्थेला बळकटी मिळाली आहे. शिवाय रोजगाराच्या नवनवीन संधीही उपलब्ध होत आहेत.

जेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदींनी मेक इन इंडियाची घोषणा केली होती. तेव्हा विरोधकांनी त्याची खिल्ली उडवली होती. पण आज भारताने संरक्षण उत्पादन निर्यातीत जी भरारी घेतली आहे, त्यात पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या मेक इन इंडियाचा सिंहाचा वाटा आहे. भारताने संरक्षण उत्पादन क्षेत्रात घेतलेली भरारी, हे आत्मनिर्भर भारताचं प्रतीक आहे. भारताने संरक्षण उत्पादन क्षेत्रात जे यश मिळवलय, त्याचं जगभरात कौतुक होत आहे. भारत संरक्षण उत्पादन क्षेत्रात ज्या वेगाने प्रगती करत आहे, ते पाहता लवकरच भारत देश सर्वाधिक संरक्षण उत्पादने निर्यात करणाऱ्या देशांच्या यादीत प्रथम क्रमांकावर येईल याची पूर्ण खात्री आहे. भारताची संरक्षण उत्पादन क्षेत्रातील गरुड झेप, ही प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाची बाब आहे.

**(लेखक हे समाजसेवक, मुक्त पत्रकार आहेत.)**

# स्वस्त विजेच्या दिशेने वाटचाल...

● **विश्वास पाठक**, स्वतंत्र संचालक महावितरण

> महिन्याकाठी १०० युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांचे प्रमाण राज्यात ७५ टक्के आहे. या ग्राहकांसाठी सध्या असलेला प्रति युनिट ८ रुपये १४ पैसे हा दर १ एप्रिलपासून ७ रुपये ६५ पैसे इतका कमी करण्याचा प्रस्ताव महावितरणने ठेवला आहे. अन्य ग्राहकांना लागू असलेले दरही टप्प्याटप्प्याने कमी करण्याचे नियोजन आहे.

**घरगुती**, औद्योगिक, व्यावसायिक आणि कृषी अशा राज्यातील सर्व ग्राहकांना वीजपुरवठा करणाऱ्या महावितरणने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे वीजदर वाढविण्यासाठी नव्हे तर आम्हाला दर कमी करू द्या, म्हणून ऐतिहासिक याचिका सादर केली आहे. महावितरण ही सरकारी कंपनी ग्राहकांना वीज देऊन बिले वसूल करत असली तरी या कंपनीला विजेचा दर ठरविण्याचा अधिकार नाही. कायदेशीर तरतुदीनुसार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग राज्यातील वीजनिर्मिती, वहन आणि वितरण करणाऱ्या सरकारी व खासगी कंपन्यांचे दर ठरवितो. त्यानुसार दर पाच वर्षांनी महावितरण आयोगासमोर आपला जमाखर्च सादर करून विजेचा दर ठरविण्यासाठी याचिका सादर करते. आयोग जनसुनावणी करून निर्णय देतो. आयोगाने ठरविलेला विजेचा दर लागू होतो. दरवेळी महावितरण वीजदरात वाढ करण्यासाठी याचिका दाखल करते, पण यावेळी प्रथमच आम्हाला वीजदर कमी करू द्या, म्हणून याचिका दाखल झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात हा चमत्कार घडला आहे.

विजेच्या दरात पाच वर्षांच्या कालावधीत टप्प्याटप्प्याने कपात, घरगुती वीज ग्राहकांना सकाळी ९ ते सायंकाळी



५ वाजेपर्यंतच्या वीजवापरासाठी प्रति युनिट ८० पैसे ते १ रुपये अतिरिक्त सवलत आणि उद्योगांवरील क्रॉस सबसिडीचा बोजा हटविणे ही महावितरणच्या यावेळच्या याचिकेची तीन ठळक वैशिष्ट्ये आहेत. या बाबी राज्यातील सर्वसामान्य लोकांना दिलासा देण्यासोबतच राज्याच्या आर्थिक विकासाला चालना देणाऱ्या आहेत. महावितरणच्या प्रस्तावाला आयोगाने मान्यता दिल्यानंतर १ एप्रिलपासून हे लाभ मिळू लागतील. राज्यातील घरगुती वीज ग्राहकांमध्ये महिना १०० युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांचे प्रमाण ७५टक्के आहे. महावितरणच्या प्रस्तावानुसार या ग्राहकांना सध्या असलेला प्रति युनिट ८ रुपये १४ पैसे हा दर २०२५-२६ या आगामी आर्थिक वर्षात म्हणजे १ एप्रिलपासून ७ रुपये ६५ पैसे इतका कमी करण्यात येईल. पुढे हा दर आणखी कमी करण्यात येईल. पाच वर्षांच्या कालावधीत या ग्राहकांसाठीचा विजेचा दर ५ रुपये ८७ पैसे प्रति युनिट या पातळीपर्यंत येईल. अर्थात या ग्राहकांसाठीचा वीजदर पाच वर्षांत २३ टक्के कमी होईल.

दरमहा १०० ते ३०० युनिट वीज वापरणाऱ्या घरगुती ग्राहकांचे प्रमाण २२.४ टक्के इतके आहे. या ग्राहकांसाठीचा सध्याचा प्रति युनिट वीजदर १३ रुपये २४ पैसे इतका आहे. आगामी आर्थिक वर्षात तो प्रति युनिट २५ पैशांनी वाढवून १३ रुपये ४९ पैसे करण्याचे प्रस्तावित आहे. तथापि, नंतरच्या वर्षांमध्ये हा दर घसरत जाऊन पाचव्या वर्षी ११ रुपये ८२ पैसे होईल. या वर्गासाठी पाच वर्षांत विजेचा दर १२ टक्के कमी होईल. महिना ३०० युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांचे प्रमाण एकूण घरगुती ग्राहकांमध्ये सुमारे ९८ टक्के आहे व त्यांना दिलासा देण्यात आला आहे.

### दिवसा वीज वापरा, सवलत मिळवा

घरगुती ग्राहकांसाठी आणखी एक महत्त्वाची भेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महावितरण या सरकारी कंपनीने देऊ केली आहे. घरगुती ग्राहकांना सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत वापरलेल्या विजेच्या दरात अतिरिक्त सवलत देण्यात येईल. आगामी २०२५-२६ या आर्थिक वर्षात प्रति युनिट ८० पैसे, त्यानंतरच्या चार वर्षांमध्ये दरवर्षी अनुक्रमे ८५ पैसे, ९० पैसे, ९५ पैसे आणि १ रुपया अशी सवलत मिळेल.

कोणत्या वेळेला वीज वापरली त्यानुसार वीजदरात सवलत देण्याला तांत्रिक भाषेत टीओडी (टाइम ऑफ डे) म्हणतात. टीओडीची सवलत आतापर्यंत केवळ उद्योगांना होती. आता ती घरगुती ग्राहकांनाही देण्यात येणार आहे. या सवलतीचा वापर करण्यासाठी कोणत्या वेळी किती वीज वापरली याची नोंद ठेवणारे टीओडी मीटर बसविणे आवश्यक असते. महावितरण हे मीटर ग्राहकांना मोफत बसवून देत आहे. त्यामुळे जे ग्राहक हे मीटर बसवून घेतील, त्यांना १ एप्रिलपासून वीजदरात आणखी सवलत मिळविता येईल. १ एप्रिलनंतर दिवसा ८० पैसे प्रति युनिट सवलतीचा वापर करून १०० ते ३०० युनिट वीज वापरणारे ग्राहक त्यांच्यासाठीच्या दरातील २५ पैशांच्या वाढीवर मात करू शकतात.

### उद्योगांसाठीचे स्वप्न साकारले

राज्यात महावितरण शेतकऱ्यांना सरासरी वीजदराच्या तुलनेत ८२ टक्के सवलतीने वीज पुरविते. शेतकऱ्यांना वीजदरात सवलत देण्यासाठी उद्योगांच्या वीजदरात वाढ करून भरपाई केली जाते. त्याला क्रॉस सबसिडी म्हणतात. यामुळे उद्योगांसाठीच्या वीजदरात वाढ होते. क्रॉस सबसिडीचा बोजा हटवावा, अशी उद्योगांची अनेक दशकांची मागणी आहे. राज्यात उद्योगधंद्यांची वाढ होऊन रोजगार व संपत्तीची निर्मिती होण्यासाठी हे आवश्यकही आहे. अखेरीस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात उद्योगांवरील क्रॉस सबसिडी हटविण्याचे स्वप्न साकारले आहे. आगामी आर्थिक वर्ष २०२५-२६ पासून म्हणजेच १ एप्रिलपासून उद्योगांना सरासरी वीजपुरवठा दरानुसार दर आकारण्याचा महावितरणचा प्रस्ताव आहे. त्यामुळे इतिहासात पहिल्यांदाच उद्योगांवरील क्रॉस सबसिडीचा बोजा हटविण्यात यश आले आहे. अनेक वर्षे स्वप्न पाहिलेले अटल सेतू, मुंबईचा कोस्टल रोड, नागपूर-मुंबई समृद्धी महामार्ग हे अशक्य वाटणारे प्रकल्प मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात साकारले आहेत. त्याच पद्धतीने उद्योगांवरील क्रॉस सबसिडी हटविण्याचे स्वप्न साकारत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महावितरणने उद्योगांच्या बाबतीत आणखी एक यश मिळविले आहे. आगामी पाच वर्षांत टप्प्याटप्प्याने उद्योगांच्या वीजदरात कपात करण्याचा प्रस्ताव महावितरणने मांडला आहे. त्यासोबतच डेटा सेंटर, सेमीकंडक्टर अशा सनशाइन इंडस्ट्रीसाठी हरित ऊर्जा कोणताही अतिरिक्त आकार न देता उपलब्ध करण्याचाही प्रस्ताव महावितरणने मांडला आहे.

शेतकऱ्यांना कृषी पंपांसाठी पाच वर्षे मोफत वीज, त्यांना दिवसा आणि भरवशाचा वीजपुरवठा करणार, घरगुती ग्राहकांच्या वीजदरात पाच वर्षांत टप्प्याटप्प्यांनी कपात करणार, घरगुती ग्राहकांना दिवसा वीज वापरण्यास अतिरिक्त टीओडी सवलत देणार, औद्योगिक ग्राहकांवरील क्रॉस सबसिडीचा बोजा हटविणार, उद्योगांचा वीजदर कमी करणार हा वीज क्षेत्रातील चमत्कार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात हा चमत्कार कसा झाला, हे समजून घेणे आवश्यक आहे.

गेली अडीच वर्षे देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्याने सौरऊर्जेसह अपारंपरिक ऊर्जेच्या वापरावर भर दिला आहे. आगामी काळात २०३५ पर्यंतची विजेची गरज भागविण्यासाठी ४२,००० मेगावॉटच्या वीजखरेदीचे करार करण्यात आले आहेत. यामध्ये मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या १६ हजार मेगावॉट क्षमतेच्या सौरऊर्जानिर्मिती प्रकल्पाचा समावेश आहे. याखेरीज पंप स्टोरेज या आधुनिक जलविद्युत तंत्रासह, बॅटरी स्टोरेज, पवन ऊर्जा यांच्या माध्यमातूनही वीज मिळणार आहे. ही सर्व वीज पारंपरिक विजेपेक्षा खूप स्वस्तात मिळणार आहे. सौरऊर्जेसह अपारंपरिक ऊर्जेचा वापर करण्यामुळे आगामी पाच वर्षांत महावितरणचे वीजखरेदीचे ६६ हजार कोटी रुपये वाचणार आहेत. देवेंद्र फडणवीस यांनी काळाची पावले ओळखून अपारंपरिक ऊर्जावापरावर भर दिल्यामुळे ही बचत होणार आहे. परिणामी, वर उल्लेख केल्याप्रमाणे वीज क्षेत्रातील चमत्कार होणार आहे.

**(श्री. पाठक हे भाजपाचे सह मुख्य प्रवक्ते आहेत.)**

# सागरमाला आणि वाढवण : विकासाची सुदर्शनचक्रे

● भावेश ब्राह्मणकर

जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था झालेला भारत आता पहिल्या तीनमध्ये येण्याची स्वप्ने पहात आहे. गेल्या दीड दशकात विकास चक्रे गतिमान झाली आहेत. आणि आता सागरमाला ही योजना आणि वाढवण हे बंदर विकसित करण्याचे उद्दीष्ट समोर आहे. हे दोन्ही प्रकल्प म्हणजे विकासाचे सुदर्शनचक्रच म्हणायला हवे. कारण, सुदर्शनचक्र हे कुठल्याही बाजूला भरभिरतानाच अचूक लक्ष्य वेधते. अगदी तशाच पद्धतीने हे दोन्ही प्रकल्प प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरित्या असंख्य क्षेत्र तसेच व्यवसायांवर परिणाम करणार आहेत. यातून रोजगार निर्मिती, गुंतवणूक आणि अर्थव्यवस्थेला चालना अपेक्षित आहे.

### सागरमाला प्रकल्प

सागरमाला हा केंद्रातील मोदी सरकारचा अतिशय महत्वाकांक्षी प्रकल्प आहे. भारताला तिन्ही बाजूने सागरी किनारा लाभला आहे. पश्चिमेला अरबी समुद्र, दक्षिणेला हिंद महासागर आणि पूर्वेला बंगालचा उपसागर. जलमार्गाने होणारी मालवाहतूक ही अधिक सुरक्षित, किफायतशीर आणि स्वच्छ आहे. सध्या भारतातील किमतीच्या दृष्टीने ९५ टक्के व संख्यामानानुसार ७० टक्के मालवाहतूक सागरी मार्गाने होते. तरीही आधुनिक तंत्रज्ञान व पायाभूत सुविधा यांच्या अभावामुळे सागरी मालवाहतुकीबाबत भारत इतर आशियाई देशांच्या तुलनेत मागेच आहे. जागतिक स्पर्धेत



टिकून राहण्यासाठी भारताला सागरी मालवाहतुकीच्या सुधारणेवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे आणि त्यासाठीच हा सागरमाला प्रकल्प नियोजित करण्यात आला आहे. भारताला साडेसात हजार किलोमीटरहून अधिक समुद्र किनारा आहे. तर, १४ हजार ५०० किमीचा जलवाहतूक मार्ग आहे. ही बाब लक्षात घेऊन बंदर विकसीत करणे, बंदरांना विविध मार्गांनी जोडणे अशा बहुआयामी स्वरुपाच्या सागरमाला प्रकल्पाची रचना करण्यात आली आहे. या प्रकल्पाद्वारे देशाच्या आर्थिक विकासाला चालना देणे, प्रत्यक्ष लाखो रोजगार उपलब्ध करणे, अब्जावधींची गुंतवणूक होणे, दळणवळण सुविधा कार्यान्वित करणे, मालवाहतुकीला गती देणे अशी उद्दीष्टे डोळ्यासमोर ठेवण्यात आली आहेत. केंद्रीय बंदर, जहाज आणि जलमार्ग मंत्रालयाच्यावतीने हा प्रकल्प राबविला जात आहे. २५ मार्च २०१५ रोजी केंद्रीय मंत्रिमंडळाने या प्रकल्पाला मान्यता दिली आहे. पायाभूत गुंतवणूकीद्वारे देशांतर्गत आणि एक्झिम (निर्यात-आयात) आणि मालवाहतुकीसाठी रसद खर्च कमी करणे, पोर्ट-कनेक्टिव्हिटी, मालवाहतूक एक्सप्रेसवे, कच्च्या आणि पेट्रोलियम उत्पादनांच्या वाहतुकीसाठी नवीन पाइपलाइन, किनारपट्टी समुदायाचा विकास, प्राधान्यकृत अंतर्देशीय

जलमार्गांचा विकास आणि नवीन मल्टी–मोडल अंतर्गत वर्गीकृत प्रकल्पांची मालिका यात समाविष्ट आहे.

सागरमाला हा प्रकल्प प्रमुख बंदरे, केंद्रीय मंत्रालये, राज्य सागरी मंडळे, राज्य सरकारे आणि इतर एजन्सी यांच्याद्वारे राबविला जात आहे. जेथे शक्य असेल तेथे ते ते प्रकल्प खाजगी क्षेत्राद्वारे आणि सार्वजनिक खाजगी सहभाग (पीपीपी) द्वारे राबविण्याची तरतूद आहे. सागरमाला प्रकल्प हा तब्बल २.४ लाख कोटी रुपये एवढ्या प्रचंड क्षमतेचा आहे. यातील ३२ प्रकल्प हे पीपीपी तत्वावर साकारण्यात येत आहेत. आतापर्यंत ४५ हजार कोटी रुपयांचे प्रकल्प पूर्ण झाले आहेत तर उर्वरीत प्रकल्प अंमलबजावणी आणि विकासाच्या विविध टप्प्यांत आहेत. या प्रकल्पासाठी सागरमाला डेव्हलपमेंट कंपनी लिमिटेडची स्थापना ऑगस्ट २०१६ मध्ये करण्यात आली आहे. बंदर पायाभूत सुविधा प्रकल्प, किनारी घाट प्रकल्प,रस्ते आणि रेल्वे प्रकल्प, फिश पोर्ट, कौशल्य विकास प्रकल्प, किनारी समुदाय विकास, क्रूझ टर्मिनल आणि रो–पॅक्स फेरी आदींचा विकास सागरमाला प्रकल्पात केला जात आहे.

विद्यमान बंदरांची क्षमता वाढवणे, त्यांना अडथळे दूर करण्यासाठी नवीन ग्रीनफील्ड बंदरे बांधणे, बंदरांची अंतर्भागाशी कनेक्टिव्हिटी सुधारणे, देशांतर्गत जलमार्ग (अंतर्देशीय जलवाहतूक आणि किनारी शिपिंग)चा समावेश असलेल्या मल्टी–मॉडल लॉजिस्टिक धोरणांद्वारे कार्गो हस्तांतरणाची किंमत आणि गती वाढवणे, बंदरे किनारी आर्थिक क्षेत्रे आणि बंदरांच्या जवळ औद्योगिक क्लस्टर तयार करणे, देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय वस्तूंच्या शिपिंगचा वेळ आणि खर्च कमी करणे, रोजगार निर्मिती, मत्स्यपालन विकास आणि किनारी पर्यटनासाठी पुढाकार घेणे, किनारी समुदायांच्या शाश्वत विकासाला प्रोत्साहन देणे, पर्यावरणीयदृष्ट्या सौम्य आणि शाश्वत मालवाहतुकीसाठी अंतर्देशीय आणि किनारी नद्यांचा वापर करण्यास प्रोत्साहन देणे अशा स्वरुपाचा सागरमाला प्रकल्प सध्या प्रगतीपथावर आहे. या प्रकल्पाद्वारे मालाची हाताळणी, देशखभाल आणि वाहतूक यातील खर्च कमी करणे, कमीत कमी वेळात माल एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पोहचवणे, देशांतर्गत माल वाहतुकीची किंमत कमी करणे, मोठ्या प्रमाणात मालासाठी रसद खर्च कमी करण्यासाठी बंदरांच्या जवळ संभाव्य औद्योगिक साइट शोधणे, निर्यात स्पर्धात्मकता सुधारण्यासाठी, बंदरांच्या जवळ स्वतंत्र उत्पादन क्लस्टर विकसित करणे, निर्यातीतून आयातीकडे कंटेनर हलवण्याचा वेळ खर्च कमी करणे, पायाभूत गुंतवणुकीचा सर्वोत्तम वापर करून देशांतर्गत माल वाहतुकीची किंमत कमी करणे, सागरी पर्यटनाला चालना देणे आदी उद्देश आहेत. ४० लाख नवीन थेट नोकऱ्या आणि ६० लाख नवीन अप्रत्यक्ष नोकऱ्या निर्माण करण्याचे ध्येय निश्चित करण्यात आले आहे.

२०१९ मध्ये सरकारने बंदरांसाठी एक राष्ट्रीय ग्रीड विकसित करण्याची घोषणा केली होती जी प्रमुख आणि किरकोळ बंदरांना जोडेल. त्यामुळे बंदर संचालनाची कार्यक्षमता वाढेल आणि बंदरांचा सतत विकास होईल. मार्च २०२१ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, भारत २०३५ पर्यंत बंदर प्रकल्पांमध्ये ८२ अब्ज डॉलर गुंतवण्याची योजना आखत आहे. सागरी क्षेत्रात स्वच्छ अक्षय ऊर्जा स्त्रोतांचा वाटा वाढवा, जलमार्ग विकसित करणे, सी प्लेन सेवा वाढवणे आणि दीपगृहांच्या आसपास पर्यटनाला चालना देणे हे सर्व केले जाईल. बंदर मंत्रालयाने गुंतवणूक करण्यायोग्य ४०० प्रकल्पांची यादी तयार केली आहे. ज्यात ३१ अब्ज डॉलरची गुंतवणूक क्षमता आहे. हे सागरी क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी भारताची बांधिलकी आणखी मजबूत करेल. प्रमुख बंदरांची क्षमता जी २०१४ मध्ये ८७० दशलक्ष टन होती, ती वार्षिक १५५० मेट्रिक टन पर्यंत वाढली आहे. २०३० पर्यंत २३ जलमार्ग कार्यान्वित करण्याची आणि बंदर क्षेत्रात खाजगी गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यावर भर देण्याची योजनाही विचाराधीन आहे.

सागरमाला कार्यक्रमांतर्गत बंदर आधुनिकीकरण, बंदर कनेक्टिव्हिटी, बंदर एलईडी औद्योगिकीकरण, तटीय समुदाय विकास आणि समुद्रातील मासेमारी या सर्वांसाठी एकूण ८३९ प्रकल्प निश्चित करण्यात आले. ५.८० कोटी रुपयांचे हे प्रकल्प आहेत. त्यातील २६२ प्रकल्प पूर्ण झाले आहेत. २१७ प्रकल्पांचे काम सुरू आहे तर ३६० प्रकल्पांचे काम लवकरच सुरू होणार आहे. बंदरांना लागूनच कोस्टल इकॉनॉमिक झोन (किनारपट्टी आर्थिक क्षेत्र) विकसित केले जात आहे. ८ राज्यांमध्ये एकूण १४ सीईझेड निर्माण करण्याचे उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे. याद्वारे बंदरांच्या परिसरात औद्योगिकीकरणाला प्रोत्साहन दिले जात आहे. उत्पादन, सेवा, देखभाल, साठवणूक या आणि अशा विविध क्षेत्रांचा या सीईझेडमध्ये समावेश आहे.

सागरमाला प्रकल्पाची संकल्पना २००३ मध्ये तत्कालिन पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या कार्यकाळात सुरू झाली. त्यावेळी केवळ रस्ते विकास एवढ्यापुरताच ही संकल्पना होती. मात्र, त्यानंतर या संकल्पनेचा विस्तार करण्यात आला. २०१५ मध्ये बहुआयामी स्वरुपाच्या या प्रकल्पाचा चालना देण्यात आली. गेल्या ९ वर्षात सागरमालाच्या विविध उपक्रमांतर्गत ६० हजाराहून अधिक उमेदवारांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. ज्यात दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना, बहु कौशल्य विकास केंद्र, अलंग सुरक्षा प्रशिक्षण संस्था आणि सागरी व जहाज बांधणीतील उत्कृष्टता केंद्र यांचा समावेश आहे. त्याचबरोबर भारतातील किनारी आणि समुद्र पर्यटन पर्यटनाला चालना देण्यासाठीही सागरमाला मध्ये तरतूद करण्यात आली आहे. समुद्र पर्यटन, जहाजासाठी प्राधान्य बर्थिंग, तर्कसंगत क्रूझ टॅरिफ, क्रूझ जहाजांना त्यांच्या कॉलच्या संख्येवर आधारित सवलत, बहिष्कृत शुल्क काढून टाकणे, सिंगल ई–लँडिंग कार्ड, ई–व्हिसा, ऑन–अरायव्हल व्हिसा सुविधा आदींचा उपलब्ध करुन दिले जाणार आहे. सागरमाला कार्यक्रमांतर्गत रोरो आणि पॅसेंजर फेरी सेवांद्वारे प्रवासी आणि माल वाहतूक सुलभ करण्यासाठी ५७ ठिकाणी ६३ पायाभूत सुविधा प्रकल्पांचा विकास हाती घेण्यात आला आहे. १० प्रकल्प आधीच पूर्ण झाले आहेत आणि चार ठिकाणी आता कार्यान्वित आहेत. रोरो सेवांद्वारे किनारी प्रदेशांमध्ये वस्तू आणि प्रवाशांची विना अडथळा वाहतूक सुलभ करून आर्थिक विकासाला चालना मिळाली आहे. परिणामी, स्थानिक उद्योग आणि पर्यटन विकासास हातभार लागत आहे.

सागरमालाअंतर्गत महाराष्ट्रात १,१३,२८५ कोटी रुपयांच्या १२६ प्रकल्पांचे नियोजन करण्यात आले आहे. यातील २३३३ कोटी रुपयांच्या ४६ प्रकल्पांना केंद्र सरकारने अंशतः निधी दिला आहे. यातील १३८७ कोटी रुपयांचे ३७ प्रकल्प महाराष्ट्र सरकारच्या अखत्यारीत आहेत. राज्यातील २७९ कोटी रुपयांच्या ९ प्रकल्पांचे काम पूर्ण झाले आहे तर ७७७ कोटी रुपयांच्या १८ प्रकल्पांची अंमलबजावणी होत आहे. तसेच, ३३१ कोटी रुपयांच्या १० प्रकल्पांचे काम विकासाच्या टप्प्यात आहे. राज्यातील सागरमाला प्रकल्पातील विकासकामांसाठी महाराष्ट्र मेरिटाइम बोर्ड काम करत आहे. ७२० किलोमीटरचा सागरी किनारा महाराष्ट्राला लाभला आहे. राज्यात जेएनपीटी व एमबीपीटी ही दोन सार्वजनिक व जयगड हे खासगी बंदर आहे. आता डहाणूजवळ वाढवण येथे नवीन अत्याधुनिक बंदर साकारले जाणार आहे. तर, कोकणातील एकूण ९ मासेमारी बंदरांचा विकास करण्याचे प्रस्तावित आहे. त्यात रायगड जिल्ह्यातील मुरुडमधील आगरदंडा, श्रीवर्धन तालुक्यातील जीवना, रत्नागिरी जिल्ह्यतील हर्णे बंदराचा समावेश आहे. यासाठी ५५८ कोटी रुपयांचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. मासळी उतरवण्यासाठी आवश्यक असलेल्या जेट्टीसह कोल्ड स्टोरेज, मरिना, आर्ट गॅलरी, स्वच्छतागृह, उपहारगृह यात उभारले जाणार आहे. कोकणातील दिघी, जयगड यांसह नवी मुंबईतील जेएनपीटी बंदर परिसरात नवे किनारपट्टी आर्थिक क्षेत्र (कोस्टल इकॉनॉमिक झोन) विकसित करण्यात येणार आहे. या ठिकाणी ऊर्जा, पोलाद आणि पेट्रोकेमिकलवर आधारित उद्योग उभारण्यात येणार आहेत.

सागरमाला प्रकल्पाचा देशाच्या संरक्षण क्षेत्रालाही मोठा फायदा होत आहे. याअंतर्गत विकसित करण्यात येणाऱ्या बंदरांच्या ठिकाणी तटरक्षक दल, नौदल यांना टेहेळणीसाठी संधी मिळते. सैन्य तेथे तैनात राहते. याठिकाणाहून समुद्रात गस्त घातली जाते. त्यामुळे किनाऱ्यावर सुरक्षेची नजर ठेवण्यासाठीही हा प्रकल्प महत्वपूर्ण ठरत आहे. सागरमाला प्रकल्पांतर्गत बंदरांजवळील बारा शहरांचा स्मार्ट सिटी म्हणून तर १२०८ बेटांचा व १८९ दीपगृहांचादेखील विकास करण्यात येत आहे. यामुळे पर्यटनाला चालना मिळण्यास मदत होईल. केंद्र सरकारचे औद्योगिक प्रकल्प, महामार्ग प्रकल्प, विशेष आर्थिक क्षेत्र यांना सागरमालातील विविध प्रकल्पांशी जोडण्याचा आराखडा तयार करण्यात आला आहे. याद्वारे देशाच्या विकासाला गती मिळेल, अशी अपेक्षा आहे.

समुद्रात भराव टाकल्याने होणारी धूप, किनाऱ्यांलगतचे प्रदूषण आदींचा साकल्याने विचार करण्याची गरज व्यक्त होत आहे. तसेच जागतिक तपमान वाढीमुळे सागरमालाच्या प्रकल्पांवर काय परिणाम होणार आहेत, याचा अभ्यास करुन त्यासंबंधीचा कृती आराखडा तयार करायला हवा, असे पर्यावरणतज्ज्ञांचे मत आहे. पर्यावरणाची काळजी घेऊन शाश्वत विकासाचा मार्ग स्वीकारावा, अशी मागणी होत आहे. तसेच,

भारतातील पश्चिम किनारपट्टी ही पश्चिम घाटामध्ये येते. आणि हा घाटच जगातील जैविक हॉटस्पॉट पैकी एक आहे. याठिकाणी अत्यंत मौल्यवान अशी जैवविविधता आहे. सागरमालाचे अनेक प्रकल्पही पश्चिम घाटातच येतात. त्यामुळे असे प्रकल्प साकारताना पर्यावरणस्नेही पर्याय आणि तंत्रज्ञानाचा अवलंब करणे आवश्यक आहे. वायनाडसारख्या घटना घडल्यानंतर जागे होण्यापेक्षा आधीच काळजी घेणे शहाणपणाचे आहे.

### वाढवण बंदर

साधारणतः ८०च्या दशकाची ही गोष्ट आहे. त्यावेळी मुंबईच्या कुलाबा बंदरावर कार्गो व्यवसाय अतिशय बहरात होता. देशोदेशीची जहाजे आणि नौका कुलाब्याच्या बंदरात येऊन थांबायच्या. तेथूनच आयात-निर्यातीचा सारा कारभार चालत होता. पण, या बंदरावरील व्याप अतिशय वाढला आणि त्याचा मोठा परिणाम मुंबई शहराच्या वाहतूक, पायाभूत सुविधा आणि अन्य बाबींवरही झाला. येत्या काळात तर हे सारे प्रश्न उग्र होण्याच्या भीतीने केंद्र सरकारने ठोस निर्णय घेतला. तो होता नवी मुंबईतील न्हावाशेवा येथे नव्याने सुसज्ज असे जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट (जेएनपीटी) बंदर विकसीत करण्याचा. अतिशय जलदगतीने हे बंदर साकारण्यात आले आणि संपूर्ण कार्गो व्यवसाय तेथे स्थलांतरित झाला. या साऱ्यामुळे मुंबई शहराच्या अनेक प्रश्नांची सोडवणूक झाली. शिवाय जेएनपीटीतील व्यवसाय कित्येक पटींनी वाढला. नव्वदच्या दशकाला प्रारंभ होत असताना झालेला हा बदल तसेच भारताने स्विकारलेले उदारीकरण यामुळे हा निर्णय अतिशय प्रभावी ठरला. आयात-निर्यातीच्या व्यापाराला नवी चालना त्यामुळे लाभली. राज्य आणि देशाच्या विकासात ही बाब मोलाची ठरली. आता अशाच पद्धतीने एक धाडसी आणि ठोस निर्णय घेण्याची गरज येऊन ठेपली आहे. ती म्हणजे वाढवण बंदराच्या विकासाची. केंद्र सरकारने सागरमाला योजनेअंतर्गत त्यास नुकतीच मंजुरी दिली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या प्रकल्पाचे भूमीपूजनही केले आहे. २०२९ च्या अखेरीस हे बंदर कार्यन्वित होण्याची अपेक्षा आहे. या बंदराची आवश्यकता, त्याची वैशिष्ट्ये आदींचा विचार केल्यानंतरच त्याचे महत्व लक्षात येणार आहे. वाढवण हे मुंबईपासून १५० किमी अंतरावर आहे. पालघर जिल्ह्यातील वाढवण परिसर हा भाग मच्छिमार आणि आदिवासी बांधवासाठी ओळखला जातो. सद्यस्थितीतून येथे मासेमारीचा व्यवसाय प्रामुख्याने चालतो. केंद्रीय बंदरे आणि जलवाहतूक मंत्रालयाने या ठिकाणाची निवड करण्याची विविध कारणे आहेत. पश्चिम रेल्वे, मुंबई-दिल्ली महामार्ग, मुंबई-अहमदाबाद महामार्ग, जवळच असलेली मध्य रेल्वे, मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळ असे दळणवळणाचे घट्ट जाळे यालगत आहे. तर याच परिसरातून बुलेट ट्रेन जाणार आहे. शिवाय नवी मुंबईत भव्य असे अत्याधुनिक आंतरराष्ट्रीय विमानतळ साकारले जात आहे. परिणामी, या बंदरामुळे देशाच्या विकासाला प्रचंड चालना मिळणार आहे.

भारताची व्यापार धोरणे, सागरी वाहतूक क्षेत्रातील घडामोडी, आयात-निर्यातील वाढ यामुळे देशात कंटेनर व्यवसायात लक्षणीय वृद्धी झाली आहे. तसेच भविष्यात त्यात प्रचंड वाढ अपेक्षित आहे. हीच बाब लक्षात घेऊन केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालयाने अमृत काल व्हिजन २०४७, मेरीटाइम इंडिया व्हिजन २०३० जाहीर केले आहे. त्यानुसार विशेष कृती आराखडाही तयार करण्यात आला आहे. याअंतर्गत वाढवणसारख्या जागतिक दर्जाची बंदरे विकसित करणे, देशांतर्गत आणि जलवाहतूक, किनारपट्टीलगत शिपिंग आणि शाश्वत सागरी क्षेत्र निर्माण करण्याला प्राधान्य देण्यात आले आहे. अरबी समुद्राला लागून असलेल्या पश्चिम किनारपट्टीवरील तीन प्रमुख बंदरांची संपूर्ण क्षमता वापरण्यासाठी २०२९चे ध्येय ठेवण्यात आले आहे.

न्हावा शेवा येथील जेएनपीटी बंदराची कार्यक्षमता वाढविल्याने साडेसहा दशलक्ष कंटेनरचीच हाताळणी सध्या होते. ही क्षमता १० दशलक्ष कंटेनर पर्यंत जाऊ शकते. तरीही देशाची आयात आणि निर्यात तसेच आगामी काळातील वाढ लक्षात घेता नव्या आणि अत्याधुनिक बंदराची आवश्यकता निर्माण झाली आहे. त्यामुळेच वाढवणचा पर्याय निवडण्यात आला. न्हावा शेवा येथील बंदराची नैसर्गिक खोली १५ मीटर एवढी आहे. तेथे १७ हजार कंटेनरची हाताळणी आणि जहाज नांगरणीची क्षमता आहे. तर, वाढवण बंदराची नैसर्गिक खोली १८ ते २० मीटर एवढी असून तेथे २४ हजार कंटेनरची हाताळणी आणि जहाज नांगरणी होऊ शकेल. परिणामी, सिंगापूर, कोलंबोसह अन्य आंतरराष्ट्रीय बंदरांवरील भारताचे अवलंबित्व जवळपास नाहीसे होणार आहे. ■

# पं.नेहरुंनी केलेली पहिली घटनादुरुस्ती

● माधव भांडारी, प्रदेश उपाध्यक्ष (मुख्यालय)

> ह्या घटनादुरुस्तीचा प्रस्ताव मांडण्यापासून ही मनमानी व सांसदीय कार्यपद्धतीची पायमल्ली सुरु झाली. १२ मे १९५१ रोजी लोकसभेत लोकप्रतिनिधित्व कायद्याच्या मसुद्यावर चर्चा सुरु होती. ती चर्चा एकाएकी मध्येच थांबवून, कोणतीही पूर्वसूचना न देता पं.नेहरूंनी घटनादुरुस्तीचा प्रस्ताव सभागृहासमोर मांडला.

**कोणतेही** विधेयक सभागृहात मांडण्यापूर्वी त्याची माहिती कार्यक्रमपत्रिकेवर देणे, त्याच्या प्रती सदस्यांना उपलब्ध करून देणे ह्या प्राथमिक गोष्टी सरकारवर बंधनकारक असतात. पण त्यापैकी काहीही न करता, सभागृहाला कोणत्याही प्रकारची पूर्वसूचना न देता, सदस्यांना मसुदा न देता हा अत्यंत महत्वाचा, ऐतिहासिक प्रस्ताव पं.नेहरूंनी लोकसभेत मांडला. राष्ट्रपती, लोकसभा सभापती, उपपंतप्रधान ह्यांनी ह्या संदर्भातील आपापले आक्षेप पं.नेहरूंपाशी त्यापूर्वीच नोंदवले होते. सभागृहातील चर्चेत विरोधी पक्षांच्या सदस्यांनी प्रखर विरोध तर केलाच पण काँग्रेसच्या अनेक सदस्यांनी सुद्धा ह्या कार्यपद्धतीला व दुरुस्तीला विरोध नोंदवला होता.

विरोधी पक्षांच्या बाजूने चर्चेला सुरुवात करताना डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी पं.नेहरूंचे सर्व मुद्दे अत्यंत तर्कशुद्ध पद्धतीने एकामागून एक खोडून काढले. आपल्या भाषणात त्यांनी पं.नेहरूंच्या वर्मावरच बोट ठेवले होते. ते म्हणाले होते "Within a year and half of enacting



the Constitution we have come forward and however the Prime Minister might attempt to say that the changes are simple, that there is no controversy about it, he knows it in his heart of hearts.. that what he is going to do is nothing short of cutting at the very roots of the fundamental principles of the Constitution' आपल्या भाषणाच्या शेवटी त्यांनी फारच बोचरे प्रश्न उपस्थित केले. ही दुरुस्ती इतक्या घाईगर्दीने करण्याची गरज पं.नेहरूंना का वाटली हा सवाल विचारून ते पुढे म्हणाले, "Is it due to fear? Does he feel that he is incapable today to carry on the administration of the country unless he is clothed with more and more powers to be arbitrarily utilized so that his will may be the last word on the subject? Or is it his doubt in the wisdom in the wisdom of the people whose champion he has been all his life? Does he feel that the people of India have run amuck and cannot be trusted with the freedom that has been given to them?' (Parliamentary debates, Part II-Vol XII,P.9789,1951 Edition) डॉ.मुखर्जींचे भाषण एवढे प्रभावी होते की विरोधी बाकांबरोबर अनेक काँग्रेस सदस्यसुद्धा बाके वाजवून त्यांना समर्थन देत होते. एवढेच

नाही तर त्यानंतर तब्बल ७७ सदस्यांनी ‘आम्हाला आमच्या सदसदविवेकबुद्धीनुसार मतदान करण्याची परवानगी मिळावी’, अशी मागणी करणारे पत्र काँग्रेस नेतृत्वाला दिले. पं.नेहरूंसाठी ही धोक्याची घंटा होती. त्यांनी अत्यंत कठोर पद्धतीने तो सर्व विरोध दडपून टाकला व आपल्याला हवी असलेली दुरुस्ती कोणत्याही घटनात्मक चौकटीची पर्वा न करता, पाशवी बहुमताचा वापर करून, रेटून करून घेतली.



डॉ.मुखर्जींनी उपस्थित केलेल्या सर्व शंका काळाच्या ओघात अतिशय खऱ्या ठरल्या. त्यानंतरही अनेक घटनादुरुस्त्या नेहरू गांधी परिवाराने मनमानी पद्धतीने करून घेतल्या. पं.नेहरूंच्या कन्या, इंदिरा गांधी यांनी त्याच पहिल्या घटना दुरुस्तीचे अधिक पुढचे पाऊल १९७५ साली टाकले व आपल्याविरुद्ध निकाल देणाऱ्या न्यायालयांच्या अधिकारांवर टांच आणली तसेच टीका करणाऱ्या वर्तमानपत्रांचा व विरोधकांचा गळा पूर्णपणे आवळण्यासाठी दडपशाहीचे कायदे करणाऱ्या कुप्रसिद्ध ४२व्या घटना दुरुस्तीसह अनेक दुरुस्त्या केल्या. इंदिरा गांधी व काँग्रेसने ज्या फॅसिस्ट प्रवृत्तीचे प्रदर्शन आणीबाणीमध्ये घडवले त्याची पेरणी पं.नेहरूंनी १९५० सालातच केली होती. मात्र ह्या पहिल्या तसेच ४२व्या व अन्य तत्सम घटनादुरुस्त्यांची चर्चा राहूल गांधी व त्यांचे डावे सहप्रवासी कधीच करत नाहीत.

राहूल गांधींपासून शरद पवार, उद्धव ठाकरे यांच्यापर्यंत ज्या ज्या व्यक्ती आज ‘संविधान बचाव’ म्हणून उठसूट गळा काढत असतात त्यांनी ह्या इतिहासाबद्दल, आपल्या राजकारणासाठी घटनेची मोडतोड करणे ह्याच एकमेव हेतूने केलेल्या पहिल्या घटनादुरुस्तीबद्दल प्रथम बोलले पाहिजे. त्या घटनादुरुस्तीचा, ती करण्यासाठी वापरलेल्या दडप शाही तंत्राचा स्पष्ट निषेध केला पाहिजे.

ह्या सत्तर वर्षांच्या काळात आपल्या संविधानात एकंदर १०४ दुरुस्त्या केल्या गेल्या. संविधानात दुरुस्ती करण्याची गरज निर्माण होऊ शकते, ही संभाव्यता घटनाकारांनी सुरुवातीलाच लक्षात घेतली होती व घटना दुरुस्तीची कार्यपद्धती निश्चित करून दिली होती. त्यानुसार एकंदर तीन प्रकारच्या घटना दुरुस्ती करण्याची तरतूद आपल्या घटनेत आहे. त्यापैकी पहिल्या प्रकारची घटना दुरुस्ती संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये साध्या बहुमताने केली जाते, तर दुसऱ्या व तिसऱ्या प्रकारच्या घटना दुरुस्तीसाठी घटनेच्या ३६८व्या कलमाचा आधार घ्यावा लागतो. ह्या कलमानुसार दुसऱ्या प्रकारची घटना दुरुस्ती संसदेच्या दोन्ही सभागृहात किमान दोन तृतीयांश बहुमताने मंजूर करावी लागते, तर तिसऱ्या प्रकारच्या दुरुस्तीसाठी संसदेच्या मान्यतेबरोबरच किमान पन्नास टक्के राज्यांच्या विधानसभांची मंजुरी आवश्यक असते. आजवर झालेल्या एकूण घटना दुरुस्त्यांपैकी ४२ दुरुस्त्या तिसऱ्या प्रकारच्या होत्या.

आपल्याला कल्पनाही नसते, पण आपल्या घटनेत पहिली दुरुस्ती अवघ्या एक वर्षात केली गेली. पहिल्या घटना दुरुस्तीचे वैशिष्ट्य हे होते की आपण स्वीकारलेल्या संविधानातील सर्व तरतुदींचा पूर्ण अधिक्षेप करून केवळ प्रचंड बहुमताच्या जोरावर ती दुरुस्ती केली गेली. या घटनादुरुस्तीने संविधानाच्या १९ व्या कलमात बदल करण्यात आले. त्यानुसार भाषण स्वातंत्र्य आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य यावर काही नवे निर्बंध लादण्यात आले. ३) या घटनादुरुस्तीने संविधानात ३१ अ आणि ३१ ब ही दोन नवी कलमे जोडण्यात आली. त्याचबरोबर नववी अनुसूची समाविष्ट करण्यात आली. ४) पहिल्या घटनादुरुस्तीने संविधानातील. कलम १५, १९, ८५, ८७, १७४, १७६,३४१, ३४२, ३७२, ३७६ आणि ३१ क तसेच ३१ ख इत्यादी कलमांमध्ये बदल करण्यात आले. ■

# संवेदनशील नेतृत्व



**आपला** पोटचा गोळा मृत्यूच्या दाढेत असताना एक माता आपले मंगळसूत्र विकते आणि एक लाख रूपये जमा करते. तरीही ते पैसे कमी पडत असतात. काय करावे आणि उपचारासाठी लागणारी रक्कम कुठून जमा करायची, अशा विवंचनेत त्या मुलाचे आई वडील असतानाच अचानक राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना याबाबत माहिती मिळते आणि त्यांनी तत्काळ मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांना त्या मुलावर मोफत उपचारासाठी कारवाई करण्याचे निर्देश दिले. त्यातून भामरागडच्या त्या अतिदुर्गम भागातील सुनील पुंगाटी वर नागपूरच्या खासगी रुग्णालयात आता पूर्णपणे मोफत आणि चांगले उपचार सुरू आहेत. अवघ्या एका मिनीटात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्काळ कारवाई करून त्यांच्यातील संवेदनशीलपणा आणि कारवाईसाठी असलेली तत्परता दाखवून दिली.

ही केवळ एक घटना नाही. एकीकडे गडचिरोलीसारख्या दुर्गम भागातील सुनील पुंगाटीच्या मोफत उपचाराची व्यवस्था करत असतानाच शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी आमदार प्रकाश गजभिये यांचा जम्मू काश्मीर मध्ये रस्ते अपघात झाला आणि ते ते कोमामध्ये गेले होते. देवेंद्रजींना या घटनेची माहिती मिळताच त्यांनी गजभिये यांना मुंबईत आणण्याकरीता एअर म्ब्युलन्सची व्यवस्था केली आणि लिलावती रूग्णलयात दाखल केले. इतकेच नाही तर रुग्णालयात जाऊन गजभिये यांची भेट घेतली व त्यांना सर्वोत्तम उपचार मिळतील याबाबत जातीने लक्ष घातले. देवेंद्रजींची जनतेप्रती असलेली संवेदनशीलता अशा अनेक घटनांमधून पाहायला मिळाली आहे मग कोविड काळात एका चिमुकलीसाठी आवश्यक असलेल्या १६ कोटींच्या इंजेक्शनवरील ६ कोटींची सेन्ट्रल एक्साईज ड्युटी देवेंद्रजी यांनी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्याशी बोलून ६ कोटी रुपयांची ड्युटी माफ करून घेतली. वास्तविक मुख्यमंत्री या जबाबदारीने उद्धव ठाकरे यांनी हे काम करायला हवे होते पण विरोधी पक्षनेता असूनही देवेंद्रजींनी ही जबाबदारी स्विकारली आणि त्या चिमुकलीचा जीव वाचवला. कर्जतचा वेदांत ठाकरे नावाचा चिमुरडा थॅलेसेमिया नावाच्या दुर्धर आजाराशी झुंज देत होता पण आर्थिक परिस्थिती बेताची असल्यामुळे त्याचे पालक हतबल झाले होते. अशावेळी देवेंद्रजी अक्षरशः देवदूतासारखे त्यांच्या मदतीला धावुन आले आणि वेदांतच्या उपचाराची जबाबदारी घेत त्याचा जीव वाचवला. देवेंद्रजींनी अशा अनेक बालकांचे प्राण वाचवून त्यांच्या कुटुंबियांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवले आहे. राज्यातील कोणीही व्यक्ती मग ती श्रीमंत असो अथवा गरीब उपचारापासून वंचित काहू नये ही देवेंद्रजींची पहिल्यापासून भूमिका आहे. आणि त्यातूनच २०१४ मध्ये मुख्यमंत्रीपदाची शपथ घेताच त्यांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष स्थापन केला. इतकेच नाही तर उपमुख्यमंत्री असताना त्यांनी उपमुख्यमंत्री वैद्यकीय मदत कक्षाच्या माध्यमातून जानेवारी, २०२४ पासून ते ऑगस्ट २०२४ पर्यंत अवघ्या ८ महिन्यात ३२३ रुग्णांना एकूण १२ कोटी ७३ लाख रुपयांची आर्थिक मदत केली आहे. राजकारण म्हणजे केवळ सत्तास्पर्धा, आरोप-प्रत्यारोप, कटकारस्थानं यापुरतं मर्यादित नसतं. ते समाजसेवेचं एक प्रभावी साधनही ठरू शकतं, हे महाराष्ट्राच्या राजकारणात काही नेते पुन्हा पुन्हा सिद्ध करतात. अशाच नेत्यांमध्ये नाव घ्यावं लागतं देवेंद्र फडणवीस यांचं. राजकीय शत्रुत्व आणि मतभेद बाजूला ठेवून माणुसकीला प्राधान्य देणारा हा नेता अनेकांच्या जीवनात आशेचा किरण ठरत आला आहे.

### विरोधी पक्षातील आमदारांनाही आधार

राजकारणात अनेकदा सत्ताधाऱ्यांचा निधी आणि सहकार्य हे पक्षनिष्ठेनुसार वाटलं जातं. मात्र, देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना त्यांनी या परंपरेला छेद दिला. विरोधी पक्षातील आमदारांनाही सत्ताधारी आमदारांइतकाच निधी दिला. यामुळे त्यांच्याविषयी विरोधी पक्षातही आदर आणि जवळीक निर्माण झाली. राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार प्रकाश गजभिये यांची मदत करताना देवेंद्रजींनी दाखवलेला हा केवळ राजकीय सौजन्याचा भाग नव्हता, तर एक संवेदनशील नेत्याची जबाबदारी होती. ■

# 'खेलो इंडिया'चं चांगभलं

**अर्थसंकल्प** २०२५ मध्ये 'खेलो इंडिया' उपक्रमासाठी ३५१.९८ कोटी रुपयांची वाढ करण्यात आली आहे. यामुळे स्थानिक व उदयोन्मुख खेळाडूंना त्यांच्या गुणवत्तेची प्रगती करण्याची संधी मिळणार आहे. या उपक्रमामुळे भारतातील क्रीडाशाखेतील विकासाला प्रोत्साहन मिळणार आहे. यंदाच्या वर्षात ऑलिंपिक, राष्ट्रकुल किंवा एशियन गेम्ससारख्या कोणत्याच बहुराष्ट्रीय स्पर्धा नाहीत, त्यामुळे या अर्थसंकल्पात खेलो इंडिया या उपक्रमाला अधिक प्राधान्य देण्यात आले आहेत.

उदयोन्मुख तसेच स्थानिक पातळीवर खेळणाऱ्या खेळाडूंनाही त्यांची गुणवत्ता दाखविण्याची संधी मिळावी यासाठी सरकारने तयार केलेल्या महत्त्वाकांक्षी 'खेलो इंडिया' या उपक्रमासाठी यंदाही अर्थसंकल्पात मोठे आर्थिक पाठबळ मिळाले आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात 'खेलो इंडिया'साठी ३५१.९८ कोटी रुपयांची मोठी वाढ मिळाली आहे.

यंदाच्या अर्थसंकल्पात या उपक्रमासाठी तब्बल एक हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे. ही वाढ गतवर्षीच्या तुलनेत २०० कोटींनी अधिक असणार आहे. २०२४-२५ साठी ८०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. एकूणच क्रीडा खात्यासाठी ३,७९४.३० कोटी इतकी तरतूद असणार आहे. गतवर्षाच्या तुलनेत ही वाढ ३५१.९८ कोटी इतकी आहे. यंदाच्या वर्षांत ऑलिंपिक, राष्ट्रकुल किंवा एशियन गेम्ससारख्या कोणत्याच बहुराष्ट्रीय स्पर्धा नाही, त्यामुळे या अर्थसंकल्पात खेलो इंडिया या उपक्रमाला अधिक प्राधान्य देण्यात आले आहे.

खेलो इंडियाचा अपवाद वगळता विविध खेळांच्या राष्ट्रीय फेडरेशन्सना देण्यात येणारी आर्थिक मदत ३४० कोटींवरून ४०० कोटी इतकी वाढवण्यात आली आहे. २०३६ मधील ऑलिंपिकचे यजमानपद हे भारताचे मोठे स्वप्न आहे आणि त्या दृष्टीने आतापासून एकेक पाऊल उचलण्यात येत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून 'खेलो इंडिया'वर सरकारने जाणीवपूर्वक लक्ष केंद्रीय केले आहे. या उपक्रमाला वेळोवेळी आर्थिक पाठबळही देण्यात येत आहे. त्यामुळे कुमार आणि ज्युनिअर गटांच्या विविध आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भारतीय खेळाडू पदके मिळवत आहेत. एशियन्स गेम, ऑलिंपिकमध्ये विजेते खेळाडू आणि अधिक पदके मिळवण्याच्या दिशेने ही पायाभरणी असल्याचे बोलले जाते. अनेक माजी दिग्गज खेळाडूंनी 'खेलो इंडिया' या उपक्रमाचे कौतुक केलेले आहे. खेलो इंडियातून प्रगती करणारे अनेक थलेटिक्स पॅरिस ऑलिंपिक स्पर्धेत खेळले होते. आता 'खेलो इंडिया' या स्पर्धा अधिक ठोस करून ऑलिंपिक विजेते घडवण्यासाठी प्रयत्न केले जात आहे आणि त्यासाठी मिळणारी आर्थिक मदत मोलाची ठरणार आहे. ■




## ठळक तरतुदी

- **गत वर्षाच्या तुलनेत ३५१.९६ कोटींची वाढ.**
- **एकूण एक हजार कोटींची तरतूद, गतवर्षीच्या तुलनेत २०० कोटी अधिक.**
- **क्रीडा खात्यासाठी ३,७९४.३० कोटींची तरतूद.**
- **राष्ट्रीय फेडरेशन्सना देण्यात येणारी आर्थिक मदत ३४० कोटींवरून ४०० कोटींवर.**

## परिणाम

- **राष्ट्रीय प्रशिक्षण शिबिर घेणाऱ्या क्रीडा प्राधिकरणासाठी ८१५ कोटींवरून ८३० कोटींची वाढ.**
- **राष्ट्रीय उत्तेजक चाचणी प्रयोगशाळेला आता मिळणार २३ कोटी.**
- **राष्ट्रीय उत्तेजक चाचणी एजन्सीच्या अंदाजपत्रकात २०.३० कोटींवरून २४.३० कोटींची वाढ.**
- **जम्मू काश्मीरमध्ये क्रीडा सुविधांसाठी १४ कोटींवरून २० कोटींची तरतूद.**
- **राष्ट्रीय क्रीडा विकास निधीसाठी सलग दुसऱ्या वर्षी १८ कोटी कायम. मात्र खेळाडूंच्या प्रोत्साहन अनुदानात ४२.६५ कोटींवरून ३७ कोटींची कपात.**

# अटल टिंकरिंग लॅब प्रकल्प

**भारतात** लोकसंख्येच्या तुलनेत नवोन्मेष (इनोव्हेशन), संशोधन विकासाचे प्रमाण नगण्य आहे. त्यामागे असलेल्या अनेक कारणांमध्ये शालेय विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा, कुतूहल नसणे हेही एक प्रमुख कारण आहे. त्यामुळे अटल इनोव्हेशन मिशनअंतर्गत सहावी ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी अटल टिंकरिंग लॅब या प्रयोगशाळांची उभारणी करण्यात आली. या प्रयोगशाळेत विद्यार्थ्यांनी नसते उद्योग करणे अपेक्षित आहे. त्यातून त्यांना स्टेमचे म्हणजेच विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित (सायन्स, टेक्नॉलॉजी, इंजिनीअरिंग अँड मॅथेमॅटिक्स – $STEM^2$) या विषयांतील प्रयोगशील शिक्षण नवोन्मेषाच्या माध्यमातून आत्मसात करता येईल. स्टेमच्या मूलभूत संकल्पना विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामातून, उपकरणे हाताळून समजून घेता येतील आणि आपल्या कल्पकतेची भर त्यात घालता येईल.

### अटल इनोव्हेशन मिशन कशासाठी?

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी यंदाच्या अर्थसंकल्पात अशी घोषणा केली की देशातील ५० हजार शाळांमध्ये पुढील पाच वर्षांत अटल टिंकरिंग लॅब सुरू होतील. भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने २०१६ मध्ये निती आयोगाअंतर्गत (नॅशनल इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मिंग इंडिया) महत्त्वाकांक्षी अटल इनोव्हेशन मिशन ($IM^2$) सुरू केले आहे. या प्रकल्पांतर्गतच आतापर्यंत ८ हजार ७०६ अटल टिंकरिंग लॅब सुरू झाल्या आहेत. लहान मुलांमध्ये विविध समस्यांची उत्तरं शोधण्याचे आणि सर्जनशीलतेची बीजे रोवण्याचे या अटल टिंकरिंग लॅबचे उद्दिष्ट आहे. विद्यार्थ्यांना पुस्तकी शिक्षणापलीकडे जाऊन त्यांच्यातील कौशल्य विकसित करण्याचे माध्यम म्हणून या प्रयोगांकडे पाहिले जात आहे.

### या प्रयोगशाळांमध्ये काय असते ?

देशातील कोणतीही सरकारी शाळा या प्रयोगशाळेची मागणी करू शकते. अर्थात त्यासाठी काही अटी आहेत. शाळा माध्यमिक असावी, शाळेत किमान १५०० चौ. फुटांची जागा असावी. खूप विज्ञान शिक्षक असायला हवेत. दहावीत सलग तीन वर्षे शाळेचे विद्यार्थी उत्तीर्ण झालेले असायला हवेत, अशा अनेक अटी शाळांसाठी ही प्रयोगशाळा उघडण्यासाठी ठेवण्यात आल्या आहेत. शाळेला २० लाख रुपयांचा निधी मिळतो. पहिल्या वर्षी त्यापैकी १२ लाख रुपये सुरुवातीच्या सेटअपसाठी दिले जातात. यापैकी सात लाखांचे तर सायंटिफिक मटेरियलच असते. थ्रीडी प्रिंटर, रोबोटिक्सशी संबंधित मटेरिअल, क्राफ्ट मटेरिअल, इलेक्ट्रॉनिक्स, ड्रिलिंग मशीनसारखे टूल, कॉम्प्युटर मायक्रो कंट्रोल बोर्डसारखी अनेक साधने या प्रयोगशाळेत असतात.

### या प्रयोगशाळांमध्ये काय शिकता येते?

या प्रयोगशाळांमध्ये इलेक्ट्रॉनिक्स, आयओटी म्हणजेच इंटरनेट ऑफ थिंग्स, थ्रीडी प्रिंटिंग आणि रोबोटिक्स या विषयांमधील डीआयवाय (स्वत: बनवायचे) किट तयार करता येतात. कोडिंग आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्सचे टूल्स तयार करता येतात. शैक्षणिक आणि उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली मेंटॉरशिप कार्यक्रम येथे उपलब्ध असतात. अटल स्पेस मिशनसारख्या विविध नवोन्मेष स्पर्धांचे आयोजन केले केले जाते. एटीएलमध्ये नसणारी मुलेही यात भाग घेऊ शकतात.

### सरकारी शाळांसाठीही संधी ?

गेल्या काही वर्षांत तंत्रज्ञान शाखांच्या प्रवेश परीक्षांना अवास्तव महत्त्व प्राप्त झाले. त्यात गणित, विज्ञानासारख्या मूलभूत विषयांमध्ये राज्य मंडळांच्या विद्यार्थ्यांची पीछेहाट होऊ लागली. आयआयटी प्रवेश परीक्षा, होमी भाभा विज्ञान परीक्षा, ऑलिम्पियाड स्पर्धांमध्ये मुलांची चुणूक वाढवायची असेल तर लहान वयापासूनच जिज्ञासा निर्माण करणे गरजेचे आहे.खासगी शाळांमधील विद्यार्थ्यांना अनेक व्यासपीठे उपलब्ध होतात, मात्र सरकारी शाळांमधील हुशार विद्यार्थ्यांच्या या मूलभूत विषयांतील कुतूहल, शिकण्याच्या उमेदीला वाव द्यायचा असेल तर एक चांगले व्यासपीठ हवे, या गरजेतून अटल टिंकरिंग प्रयोगशाळा सुरू झाल्या आणि लाखो विद्यार्थी त्याचा लाभ घेत आहेत. मेक इन इंडियासारख्या महत्त्वाकांक्षी योजनांना वाव मिळावा आणि सरकारी शाळेतले विद्यार्थीही भविष्यातील उद्योजक व्हावेत हाही या प्रयोगशाळांचा हेतू आहे. ■




**कोल्हापूर– उपस्थिती–** अल्पसंख्यांक मोर्चा राष्ट्रीय अध्यक्ष जमाल सिद्दीकी, अल्पसंख्यांक मोर्चा प्रदेश अध्यक्ष इद्रीस मुल्तानी, अशोक माने, आश्रफ वंकर, जिल्हाध्यक्ष आजम जामदार, तय्यब कुरेशी, अमर शिग पाटील, जगन्नाथ माने आदी.




**धाराशिव– उपस्थिती–** अल्पसंख्यांक मोर्चा राष्ट्रीय अध्यक्ष जमाल सिद्दीकी, अल्पसंख्यांक मोर्चा प्रदेश अध्यक्ष इद्रीस मुल्तानी, नितीन काळे, सलीम जहागीर, जाहीर चौदरी नजीब, हाशमी निहाल काझी, मिनाज, लाला भाई, मजीत पटेल, राशिद पठाण आदी.



**बीड– उपस्थिती–** अल्पसंख्यांक मोर्चा राष्ट्रीय अध्यक्ष जमाल सिद्दीकी, अल्पसंख्यांक मोर्चा प्रदेश अध्यक्ष इद्रीस मुल्तानी, देवीदास नागरगोजे, सलीम जहागीर, मातीन तांबोळी, दौलत खान, बाबा पठाण, अतिक पटेल, नूर लाला खान, रिजाय सिद्दीकी आदी.



**मुंबई– इंडिगो एअरलाईन्सच्या २००० हून अधिक कर्मचाऱ्यांनी भाजपात प्रवेश– उपस्थिती–** प्रदेश कार्यकारी अध्यक्ष आ. रवींद्र चव्हाण, आ. पराग अळवणी, एअरपोर्ट एव्हिएशन एम्प्लॉईजचे ऑल इंडिया अध्यक्ष नितीन जाधव, सरचिटणीस सुहास माटे, योगेश आवळे, करण कांबळे, दिनेश शेवाळे, सिराज हाश्मी, चंदन कांडू, मोहम्मद शाहिद हुसेन, रणजीत नरे, राकेश कदम, लक्ष्मण सुरवसे, विजय यादव, अंकुश निकम, सुनील लोखंडे, अंकुश इंगळे, संदीप कांबळे, शैलेश पवार, सचिन काटकर, सचिन आग, सचिन कांबळे, श्रीनाथ पाडेकर, महबूब पाशा, हर्षद अहिरे, रोहित चतुर्वेदी, ओंकार नाईक, विक्रांत डोईफोडे, विनीत पाटील, संदीप सानप, पूजाताई तांडेल, सपना गोडक्या आदी सदस्य आणि कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.



**छत्रपती संभाजीनगर– उबाठा गटाच्या अनेक कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश– उपस्थिती–** प्रदेश कार्यकारी अध्यक्ष आ. रवींद्र चव्हाण, इतर मागास बहुजन कल्याण, दुग्ध विकास व अपारंपारिक ऊर्जा विभाग मंत्री अतुल सावे, भाजपा शहर जिल्हाध्यक्ष शिरीष बोराळकर, प्रदेश सरचिटणीस संजय केणेकर, माजी महापौर बापू घडामोडे, अनिल मकरिये आदी.



**सुधागड पाली (जि.रायगड)– शिवसेनेचे माजी रायगड जिल्हा संपर्कप्रमुख प्रकाश देसाई यांचा भाजपात प्रवेश– उपस्थिती–** प्रदेश कार्यकारी अध्यक्ष आ. रवींद्र चव्हाण, खा. धैर्यशील पाटील, जिल्हा सरचिटणीस गीता पारलेचा, मिलिंद पाटील, उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, सोपान जांबेकर, सुधागड मंडल अध्यक्ष श्रीकांत ठोंबरे, परळीचे सरपंच सतीश देसाई, पंकज देसाई, बापू देसाई, धर्मेंद्र आंदेकर, गोविंद करले, गोपीनाथ खापरे, निलेश काळभोर, रितेश काळभोर, विलास गलबले आदी.



**मुंबई– बाळासाहेब जाधव यांचा भाजपमध्ये प्रवेश– उपस्थिती–** प्रदेशाध्यक्ष व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, संघटन मंत्री रवींद्र अनासपुरे, आ. सीमा हिरे, महेश हिरे, सामाजिक कार्यकर्ते गणेश बोलकर, महेश जाधव आणि जन विकास फाउंडेशनचे रामकृष्ण जाधव, संजय तांबे, उमेश ठोंबरे, अरुण लांडगे, प्रकाश सुराशे, शिवाजी आप्पा शहाणे, राजू दराडे, संजय राऊत, निलेश जोशी आदी.




**नाशिक– उबाठा, मनसे, बसपा अशा विविध पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच विविध व्यापारी संघटनांचे सदस्य, उद्योजक, युवा कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश. उपस्थिती–** प्रदेश अध्यक्ष व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण, आ. सीमा हिरे, शहराध्यक्ष प्रशांत जाधव. प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांची नावे– उबाठा नेते व स्थायी समितीचे माजी सभापती शिवाजी चुंबळे, कल्पना चुंबळे, रत्नमाला राणे, हेमलता कांडेकर, प्रेम पाटील, सविता गायकर आदी.



**जालना– उपस्थिती–** सरचिटणीस सिद्धिविनायक मुळे, जिल्हा उपाध्यक्ष सुधाकर खरात, ओबीसी मोर्चा तालुकाध्यक्ष सतिश केरकळ, गोवर्धन कोल्हे, कैलाश खरात, जगदीश खरात, शिवाजी खरात, गजानन खरात, नागेश अंभोरे, शरद खरात, विठ्ठल इंदलकर, निवृत्ती लंके आदी.

RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License To Post Without Prepayment,
WPP Licence No.: MR/Tech/WPP-351/South/2024-26, Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001.
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp




प्रति,

**प्रेषक,**

**कार्यालय मंत्री :**

भारतीय जनता पार्टी,

महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,

वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०

दूरध्वनी : ०२२-२२०२२०५०, फॅक्स : ०२२-२२८५२३०५

ई मेल- bjpmaha.manogat@gmail.com